cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२८१ | रविवार दि.८ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### संसदेत गोंधळ, देशासमोर प्रश्न; उत्तर मात्र हरवले

हल्ली संसदेत जे काही घडते आहे, त्याला 'अभूतपूर्व' हा शब्दही अपुरा पडावा अशी अवस्था आहे. आजची परिस्थिती पाहता कालचा गोंधळ बरा होता, असे म्हणण्याची वेळ येते, हीच या सगळ्या घडामोडींची गंभीरता अधोरेखित करते. संसदीय परंपरांचे, संकेतांचे आणि शिष्टाचारांचे दाखले दिले जात असले, तरी प्रत्यक्षात त्या परंपरांचा लवलेशही सभागृहात दिसत नाही.

# व्यापार करार भारताच्या नाहीतर अमेरिकन शेतकऱ्यांच्या फायद्याचा

## भारत–अमेरिका करार जाहीर झाल्यानंतर काँग्रेसकडून जोरदार टीका

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराचे संयुक्त निवेदन शनिवारी (दि.७) जाहीर करण्यात आले. या व्यापार करारावरून काँग्रेसने केंद्र सरकारवर टीका केली आहे. या करारामुळे भारताच्या रशियन तेल आयातीवर अमेरिकेची देखरेख राहणार आहे. तसेच भारताने रशियन तेल आयात करण्याचे ठरवले, तर अमेरिका अतिरिक्त २५ टक्के आयातशुल्क लाऊ शकते, असे काँग्रेसने म्हटले आहे. या मुद्द्यावर केंद्र सरकारने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी संसदेत सांगितले की, भारतीयांच्या ऊर्जा सुरक्षिततेला सरकार प्राधान्य देणार आहे. बाजारातील परिस्थितीनुसार तेल आयातीत योग्य तो निर्णय घेणे ही आमची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.




काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी भारत– अमेरिका संयुक्त निवेदनावर टीका केली आहे. या निवेदनात अनेक महत्त्वाच्या तपशीलांचा उल्लेख नाही, असे ते म्हणाले. मात्र उपलब्ध माहितीनुसार, भारत रशियाकडून तेल आयात करणार नाही, असे संकेत मिळत आहेत. जर भारताने थेट किंवा अप्रत्यक्षपणे रशियन तेल खरेदी केले, तर अमेरिकेकडून पुन्हा २५ टक्के अतिरिक्त शुल्क लागू होऊ शकते, असेही त्यांनी ▶▶ पान २ वर

### सरकारने स्पष्ट भूमिका घ्यावी – मनीष तिवारी

काँग्रेसचे खासदार मनीष तिवारी यांनी या मुद्द्यावर सरकारने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी केली आहे. व्हाईट हाऊसने निवेदन दिल्यानुसार भारताने रशियाकडून तेल आयात कमी करण्याची तयारी दर्शवली असून, अमेरिकेकडून ऊर्जा खरेदी वाढवण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, याबाबत भारत सरकारकडून कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

### व्यापार करार काय आहे ?

भारत अमेरिकेतून येणाऱ्या औद्योगिक वस्तूंवरील आयात शुल्क कमी किंवा पूर्णपणे रद्द करण्याचा विचार करत आहे. तसेच काही कृषी आणि अन्न उत्पादनांनाही सवलत देण्याची तयारी दर्शवली आहे. यामध्ये सोयाबीन तेल, फळे, सुकामेवा, पशुखाद्य, वाइन यांसारख्या वस्तूंचा समावेश आहे. याशिवाय पुढील पाच वर्षांत भारत अमेरिकेकडून ऊर्जा, विमान, मौल्यवान धातू, तंत्रज्ञान उत्पादने आणि कोकिंग कोळसा यांसाठी सुमारे ५०० अब्ज डॉलरची मोठी खरेदी करणार असल्याचे सांगितले जात आहे.

## थोडक्यात...

### तिरुपतीच्या लाडूमध्ये बाथरूममधील केमिकल

हैद्राबादः आंध्र प्रदेशातील प्रसिद्ध तिरुपती व्यंकटेश्वर मंदिरातील लाडू प्रसादाचा वाद वाढला आहे. मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी धक्कादायक दावा करत सांगितले की, लाडू तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या तुपात बाथरूम साफ करण्याचे केमिकल मिसळण्यात आले होते. कुर्नूल येथे झालेल्या एका कार्यक्रमात बोलताना नायडू म्हणाले, ही भेसळ केवळ तिरुपतीपुरती मर्यादित नसून श्रीशैलम मंदिरातही असाच प्रकार घडल्याची शक्यता आहे. नायडूंनी हे वक्तव्य अशा वेळी केले आहे, जेव्हा वायएसआर काँग्रेस पक्षाने त्यांच्यावर खोटे आरोप करत असल्याचा ठपका ठेवला होता. याआधी नायडूंनी लाडूमधील तुपात बीफ टॅलो आणि डुकराची चरबी मिसळल्याचा आरोप केला होता.

### गांधींवर टीका करत सिद्धू दाम्पत्य भाजपच्या वाटेवर?

चंदीगडः एकीकडे माजी क्रिकेटपटू आणि पंजाब काँग्रेसचे माजी अध्यक्ष नवज्योतसिंग सिद्धू सध्या टीव्हीवरील कॉमेडी शोमध्ये हास्यविनोदात मग्न आहेत. तर दुसरीकडे त्यांच्या पत्नी डॉ. नवज्योत कौर सिद्धू यांची काँग्रेसने पक्षातून अधिकृतपणे हकालपट्टी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून पक्षनेतृत्व आणि सिद्धू दाम्पत्यामध्ये सुरू असलेल्या वादाचा हा परिपाक मानला जात आहे. काँग्रेसमधून बाहेर पडताना डॉ. नवज्योत कौर यांनी राहुल गांधींवर अत्यंत बोचऱ्या शब्दांत टीका केली आहे. भाजपने राहुल गांधींच्या प्रतिमेला छेद देण्यासाठी वापरलेला ''पप्पू'' हा शब्द वापरत त्यांनी राहुल गांधींना लक्ष्य केले. काही आठवड्यांपूर्वीच सिद्धू दाम्पत्याने राहुल आणि प्रियंका गांधी यांचा उल्लेख आपले 'मार्गदर्शक' असा केला होता.

### मद्यप्रेमींसाठी गुड न्यूज

दिल्लीः मद्यप्रेमींसाठी मोठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. भारताने युरोपियन युनियन आणि अमेरिकेसोबत केलेल्या ऐतिहासिक व्यापार करारांमुळे परदेशी मद्याच्या किमतीत मोठी घट होण्याची शक्यता आहे. १० दिवसांच्या अंतरात झालेल्या दोन 'ट्रेड फ्रेमवर्क' करारांमुळे आयात मद्यावर असलेले सुमारे १६६ टक्के आयात शुल्क मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. नव्या करारानुसार हे शुल्क ३० ते ४० टक्क्यांपर्यंत खाली येऊ शकते. त्यामुळे स्कॉच, बोर्बोनसारखी परदेशी ब्रँडेड दारू ४० टक्क्यांपर्यंत स्वस्त होण्याची शक्यता आहे. सध्या ४५०० ते ६००० रुपयांना मिळणारी दारू आता २५०० ते ३००० रुपयांत मिळू शकते. या निर्णयामुळे दिल्ली, नोएडा, गुरुग्रामसह देशभरातील मद्य बाजारात मोठी स्वस्ताई दिसण्याची शक्यता आहे.

### थलापती विजयला दीड कोटींचा दंड भरावा लागणार

चेन्नईः तमिळ चित्रपटसृष्टीचा सुपरस्टार थलापती विजय यांनी आयकर विभागाच्या दीड कोटी रुपयांचा दंड भरण्याच्या आदेशाला आव्हान देणारी मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळून लावली आहे. प्राप्तिकर विभागाच्या म्हणण्यानुसार, विजयने २०१५–१६ या आर्थिक वर्षात १५ कोटी रुपयांचे उत्पन्न जाहीर केले नव्हते. दंड ठोठावल्यानंतर त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली, परंतु त्यांना कोणताही दिलासा मिळाला नाही. विजय यांची याचिका फेटाळून लावताना न्यायमूर्ती सेंथिलकुमार रामामूर्ती यांनी सांगितले की, दंड आकारण्याचा आदेश विहित मुदतीत देण्यात आला होता. त्यामुळे हस्तक्षेप करण्यास वाव देणारे काहीही नव्हते. यानंतर विजय यांच्या वकिलांनी आदेशाला आव्हान देण्यासाठी परवानगी मागितली.

## एकनाथ खडसेंना कोर्टाने बजावले अजामीनपात्र वॉरंट

**पुणे । प्रतिनिधी**

**पुण्यातील बहुचर्चित भोसरी जमीन खरेदी प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी महसूल मंत्री एकनाथ खडसे यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. मुंबईतील विशेष एमपी–एमएलए न्यायालयाने एकनाथ खडसे आणि त्यांच्या पत्नी मंदाकिनी खडसे यांच्या विरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. न्यायालयाने दिलेला हा दणका खडसे कुटुंबासाठी धक्का मानला जात आहे.**



भोसरी येथील एमआयडीसीच्या जमिनीच्या खरेदी–विक्री व्यवहारात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप खडसे यांच्यावर आहे. या प्रकरणी ईडीने तपास करून खडसे दाम्पत्य आणि त्यांचे जावई गिरीश चौधरी यांच्यासह अन्य काही कंपन्यांविरुद्ध सुमारे एक हजार पानांचे दोषारोपपत्र दाखल केले आहे. या सर्वांवर मनी लॉंड्रिंगचे गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत. यापूर्वी न्यायालयाने खडसे यांचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळून लावला होता, त्यामुळे त्यांच्यावरील आरोप निश्चित होतील असे मानले जात होते. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई सत्र न्यायालयातील विशेष न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी होणार होती. यावेळी न्यायालयाकडून ▶▶ पान २ वर

# १२ जि.प.१२५ पंचायत समित्यांसाठी ६२ टक्के मतदान

## ७ हजार ४३८ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद, उद्या लागणार निकाल

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी शनिवारी (दि. ७ फेब्रुवारी २०२६) मतदान प्रक्रिया पार पडली. काही किरकोळ घटना वगळता मतदान शांततेत पार पडले असून एकूण ७ हजार ४३८ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले. या निवडणुकीची निकाल ९ फेब्रुवारी रोजी जाहीर होईल. दरम्यान, मिळालेल्या आकडेवारीनुसार राज्यात सरासरी ६२ टक्के मतदान झाल्याचे सांगण्यात येत आहे.

राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी काटेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत जाऊन मतदानाचा हक्क बजावला. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी इंदापूर तालुक्यात जिल्हा परिषद शाळा




बोराटेवस्ती, भरणेवाडी येथील मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी लिंगनूर दुमाला (ता. कागल) येथील केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. पुणे जिल्ह्यात ५२ टक्के, कोल्हापूर जिल्ह्यात ५९ टक्के, रायगड ५८.७७ टक्के, सातारा ▶▶ पान २ वर

### राज्यात ६० हून अधिक ठिकाणी ईव्हीएममध्ये बिघाड

राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडली. लोकशाहीच्या या उत्सवात नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला असला, तरी अनेक ठिकाणी निवडणूक यंत्रणेच्या ढिसाळ नियोजनाचा फटका मतदारांना बसला. राज्यभरात ६० हून अधिक मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याच्या तक्रारी समोर आल्याने निवडणूक प्रशासनाच्या सज्जतेवर आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. निवडणूक प्रक्रियेत सर्वाधिक अडथळे रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यात पाहायला मिळाले.

## अपघाताविषयी महाराष्ट्र पुरावा मागतोय-मिटकरी

**अकोला । प्रतिनिधी**

**बारामती येथील विमान अपघाताची थातूरमातूर चौकशी अहवाल येत आहेत. अजितदादा पवार इतकी सामान्य व्यक्ती नव्हते, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार अमोल मिटकरी यांनी सुनावले आहे. महाराष्ट्र पुरावा मागतोय, असे देखील ते म्हणाले.**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान दुर्घटनेत २८ जानेवारीला निधन झाले. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली. त्यानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. या सर्व घटनेवर आमदार अमोल मिटकरी यांनी संशय व्यक्त करीत अनेक प्रश्न उपस्थित केले होते. आता पुन्हा एकदा मिटकरींनी समाज माध्यमांवर पोस्ट करीत अपघाताच्या चौकशीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, अजितदादा पवार यांच्या विमान अपघाताचा थातूर–मातूर चौकशी अहवाल येण्यास सुरुवात झाली आहे. अजितदादा इतके ▶▶ पान २ वर

## बीड जिल्ह्यातील संत महंताकडून बारामतीत पवार कुटुंबीयांचे सांत्वन



**पुणे । प्रतिनिधी**

**दिवंगत लोकनेते अजित दादा पवार यांच्या अपघाती निधनानंतर बीड जिल्ह्यातील संत महंत यांनी बारामती येथे जाऊन पवार कुटुंबियांचे सांत्वन केले. विद्या प्रतिष्ठानच्या सभागृहामध्ये स्व. अजितदादांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी खासदार शरद पवार, बीड येथील नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज, पार्थ पवार, जय पवार आदी उपस्थित होते.**

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अपघाती निधन झाल्यामुळे जिल्ह्याचेच नव्हे तर राज्याचे मोठे नुकसान झाले आहे. दादांच्या जाण्याने राजकारणातली आणि पक्षात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. दिलेला शब्द पाळणारे नेते म्हणून दादाची ओळख होती. ते दादा आज नसल्याने, बीड जिल्ह्यातील संत महंतांनी बारामती येथे जाऊन पवार कुटुंबियांचे सांत्वन केले. पवार कुटुंब यांना या दुखातून सावरण्याची ईश्वर शक्ती देवो, अशा स्वरूपाची श्रद्धांजली विद्या प्रतिष्ठान येथील सभागृहात झालेल्या श्रद्धांजली कार्यक्रमात संत ▶▶ पान २ वर

## सात वर्षांपर्यंत शिक्षेच्या गुन्ह्यांत थेट अटक नको-सर्वोच्च न्यायालय



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

सात वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद असलेल्या गुन्ह्यांमध्ये आरोपींना थेट अटक करता येणार नाही, असे ठाम मत सर्वोच्च न्यायालयान व्यक्त केले आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहितेमधील (बीएनएसएस) कलम ३५(३) अंतर्गत नोटीस देणे पोलिसांसाठी अनिवार्य असल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने अटक ही नेहमीची प्रक्रिया ठरू शकत नाही, असेही नमूद ▶▶ पान २ वर

# महायुतीत वादाच्या ठिणग्या !

## शरद पवारांना शह देण्यासाठी शपथविधी घडवून आणला ; रामदास कदम यांचा आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुप्त संघर्ष सुरू झाला आहे. अग्निसंस्काराची राख थंड होत नाही तोच तिसऱ्या दिवशी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार याचा उपमुख्यमंत्री पदाचा शपथविधी झाला. हा शपथविधी करून घेण्यात आला यावरून टिकेची झोड उठली आहे. अजित पवारांच्या निधनाला ७२ तासही उलटत नाहीत, तोच सुनेत्रा पवारांनी शपथ घेतल्याने यावर विरोधकांकडून टीका होत आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या वरिष्ठ नेत्यांनी शरद पवारांना शह देण्यासाठी हा शपथविधी घडवून आणला, असा आरोपही विरोधकांकडून करण्यात येत आहे. यावरून शिंदे शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर खळबळजनक आरोप केले.





रामदास कदम यांनी अजित पवार यांच्या निधनानंतर घडलेल्या घडामोडीवर भाष्य करताना सुनिल तटकरे यांच्यावर टीकेची झोड उठवली. अजितदादांच्या जाण्यानंतर शरद पवार यांना शह देण्यासाठी सुनिल तटकरे यांनी अत्यंत गलिच्छ राजकारण केले. दादांच्या चितेची राख देखील शांत झाली नव्हती, तोच तटकरेंनी वहिनींना (सुनेत्रा पवार) उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घ्यायला लावली. दहा दिवस पाळू दिले नाही पण त्यानंतर शपथविधी झाला असता तर काय बिघडलं असते? असा सवाल करून अजितदादांना सुनिल तटकरेंनी संपवलं असल्याचं वक्तव्य केलं आहे. राजकारणात जो माझ्या मुलाला संपवण्याचा प्रयत्न करू शकतो, तो काहीही करू शकतो, शरद पवार पक्षाचा ताबा घेतील, या भीतीने तटकरेंनी ही 'चालाख खेळी' ▶▶ पान २ वर

## १२ लाखाची फसवणूक

### साताऱ्याच्या सहा जणावर गुन्हे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**राजमा बियाणे पुरवठा करण्याच्या नावाखाली आंजोगाई येथील यिाणे व्यापाऱ्याची १२ लाख ८० हजार २०० रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात साताऱ्यातील 'एस फ्रेश फार्मर प्रोड्युसर कंपनी'च्या ६ संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, अंबाजोगाई येथील सुयश प्रेमचंद मुथा (रा. गुरुवार पेठ, आंजोगाई) हे यिाणांचा व्यवसाय करतात. जुलै २०२५ मध्ये साताऱ्याच्या 'एस फ्रेश फार्मर प्रोड्युसर कंपनी'चे संचालक संजय ाबासाहे भगत आणि ओंकार संजय भगत यांनी मुथा यांची भेट घेऊन त्यांना राजमा बियाण्याचे उच्च दर्जाचे नमुने दाखवले होते. त्यानुसार मुथा यांनी २१ जुलै २०२५ रोजी एकूण ८५ टन राजमा खरेदीचा करार ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

बीड, दि.७ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः ९.५० क्विंटल | २,३०० | २,९११ | २,५७० |
| ज्वारी/हायब्रिड : २८.५० क्विंटल | २,४५१ | ४,०५६ | ३,३२२ |
| मका/लोकलः ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ५४.०० क्विंटल | ७,४०१ | ८,१०० | ७,८८२ |
| उडीद : १.०० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| बाजरीः ९.०० क्विंटल | २,४३१ | २,९५० | २,७९० |
| मुगः २.०० क्विंटल | ६,८०१ | ६,८०१ | ६,८०१ |
| सोयाबीनः २१.५० क्विंटल | ५,६०० | ५,६०० | ५,६०० |
| हरभराः०.५० क्विंटल | ५,३०० | ५,३०० | ५,३०० |

cmyk

अग्रलेख

# संसदेत गोंधळ, देशासमोर प्रश्न; उत्तर मात्र हरवले

हल्ली संसदेत जे काही घडते आहे, त्याला 'अभूतपूर्व' हा शब्दही अपुरा पडावा अशी अवस्था आहे. आजची परिस्थिती पाहता कालचा गोंधळ बरा होता, असे म्हणण्याची वेळ येते, हीच या सगळ्या घडामोडींची गंभीरता अधोरेखित करते. संसदीय परंपरांचे, संकेतांचे आणि शिष्टाचारांचे दाखले दिले जात असले, तरी प्रत्यक्षात त्या परंपरांचा लवलेशही सभागृहात दिसत नाही. चर्चेऐवजी घोषणाबाजी, मुद्द्यांऐवजी आरोप आणि संवादाऐवजी विखारी शब्दांचा मारा हेच सध्या संसदेचे वास्तव झाले आहे. विचारधारा, धोरणे किंवा देशहिताचे प्रश्न यांवर चर्चा होण्याचा काळ मागे पडून आता उणीदुणी काढणे आणि एकमेकांना कोंडीत पकडणे हाच अधिवेशनाचा मुख्य अजेंडा ठरत असल्याचा भास निर्माण झाला आहे. सध्याच्या अधिवेशनात सलग सहा-सात दिवस गदारोळच सुरू असून, तोच जणू कामकाजाचा केंद्रबिंदू झाला आहे.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर पंतप्रधानांनी लोकसभेत उत्तर द्यायचे होते. मात्र, सभागृहाचे कामकाजच स्थगित करण्यात आले. काँग्रेसच्या काही खासदारांकडून काहीतरी अघटित किंवा अनपेक्षित घडण्याची शक्यता असल्याची माहिती आपल्याकडे होती, असा खळबळजनक दावा लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी केला. काही सदस्य पंतप्रधानांच्या आसनापर्यंत जाण्याची शक्यता होती, असेही त्यांनी सांगितले. लोकशाही परंपरेला मोठा तडा जाऊ नये म्हणून आपणच पंतप्रधानांना लोकसभेत न येण्याची विनंती केली, असा खुलासाही सभापतींनी केला. या विधानामुळे राजकीय वातावरण अधिकच तापले. काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी पंतप्रधान मोदी हे सभापतींच्या आड लपून स्वतःचा बचाव करत असल्याचा आरोप केला. पंतप्रधानांना इजा पोहोचवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. लोकसभेत गोंधळामुळे पंतप्रधान आले नाहीत, मात्र राज्यसभेत त्यांनी दीड तासांचे प्रदीर्घ आणि जोरदार भाषण केले. त्या भाषणात काही मुद्द्यांवर चर्चा झाली खरी; परंतु काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकारे हेच त्यांच्या टीकेचे मुख्य लक्ष्य राहिले. वास्तविक पाहता एसआयआरपासून आंतरराष्ट्रीय व्यापार करारांपर्यंत, अमेरिकेसोबत झालेल्या जाहीर न झालेल्या करार अटींपर्यंत अनेक गंभीर मुद्द्यांवर विरोधी पक्ष सरकारला जाब विचारू शकत होता. मात्र, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी वेगळाच अजेंडा समोर आणला. निवृत्त लष्करप्रमुख नरवणे यांच्या पुस्तकातील मजकूर वाचण्याचा त्यांनी प्रयत्न केला. सरकारने यावर आक्षेप घेतला आणि त्यामुळे गोंधळ आणखी वाढला. काँग्रेसचा दावा असा की राहुल गांधी हे पुस्तकच पंतप्रधानांना भेट देणार होते; मात्र पंतप्रधान लोकसभेत आलेच नाहीत. सत्तापक्षाचे म्हणणे वेगळे पंतप्रधान ज्या आसनावर बसतात त्या जागेभोवती काँग्रेसच्या महिला खासदारांनी घेराव घातला होता. त्यामुळे काही अनपेक्षित घडेल, अशी भीती सभापतींनाही वाटली. काँग्रेस मात्र याला ठामपणे नकार देते. विरोधी पक्षांना सभागृहात बोलू दिले जात नाही, याविरोधात महिला सदस्य निषेध करत होत्या, असा त्यांचा युक्तिवाद आहे. थोडक्यात, दोन्ही बाजूंनी आरोप-प्रत्यारोपांचा धुरळा उडवून दिला. या सगळ्या पार्श्वभूमीवर एक गंभीर प्रश्न उभा राहतो, ज्या सभागृहाला लोकशाहीचे मंदिर मानले जाते, त्या ठिकाणीच प्रतिनिधींना स्वतः सुरक्षित वाटत नसेल, तर देशाच्या लोकशाहीचे भवितव्य काय?

राज्यसभा ही ज्येष्ठांचे, अनुभवांचे सभागृह मानली जाते. मात्र, तेथेही चर्चेचा स्तर अलीकडच्या काळात घसरलेला दिसतो. पंतप्रधान आणि विरोधी पक्षनेतेदोघेही वयाने व अनुभवाने ज्येष्ठ असतानाही जर सभागृहात असा गोंधळ होत असेल, तर अन्य सदस्यांकडून फारशा अपेक्षा ठेवणे कठीण ठरते. या सगळ्या गदारोळात देशासमोर उभे असलेले खरे प्रश्न मात्र दुर्लक्षित राहत आहेत. देशांतर्गत आणि जागतिक पातळीवर सध्या कोणते विषय महत्त्वाचे आहेत, त्यावर किती गांभीर्याने चर्चा होणे आवश्यक आहे, हे कुठेतरी हरवलेले दिसले. युरोपीय संघासोबत झालेले करार, अमेरिकेच्या अध्यक्षांनी सोशल मीडियावरून जाहीर केलेली टेरिफ कपात, शेतकऱ्यांच्या हितावर त्याचा होणारा परिणाम, अमेरिकेपुढे भारताने काही तडजोड केली आहे का, रशियाकडून तेल खरेदी थांबवली आहे का आणि त्यामुळे भारत - रशिया संबंधांचे भवितव्य काय या सगळ्या प्रश्नांवर देशाला स्पष्टता हवी आहे. मतदार याद्यांच्या संदर्भातील आक्षेपही धोकादायक वळणावर पोहोचले आहेत. जर या आक्षेपांना असा मुलामा दिला जात असेल की देशातील एका मोठ्या वर्गाला 'नागरिकत्वाबाहेर' ढकलण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा संदेश समाजात जाऊ लागला, तर त्याचे परिणाम गंभीर ठरू शकतात. जागतिक पातळीवरही परिस्थिती नाजूक आहे. काही आठवड्यांपूर्वी जितके अस्थिर वातावरण होते, तितके आता नसले तरी ही शांतता वरवरची आहे, असे अनेक संकेत आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण करण्यात आलेल्या जागतिक यंत्रणांनाच सध्या आव्हान दिले जात आहे. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस यांनीही याबाबत अप्रत्यक्ष नाराजी व्यक्त केली आहे.

जगातील सर्वाधिक लोकसंख्या, तरुणांची मोठी ताकद आणि दीर्घ लोकशाही परंपरा असलेला देश म्हणून भारताकडे सध्या विशेष लक्ष आहे. विकसित राष्ट्रेही भारताबद्दल भारतापेक्षा अधिक बोलताना दिसत आहेत. ही संधी केवळ एका सरकारची नाही, तर भारताने आजवर केलेल्या प्रवासातून मिळवलेले फलित आहे. ही संधी मात्र फुटकळ राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या गदारोळात हरवता कामा नये. कोणी कोणाच्या घराणेशाहीवर बोट दाखवायचे आणि कोणी कोणाच्या एककल्ली स्वभावावर टीका करायची, यातून देशाचे काहीही भले होणार नाही. उलट, इतिहासात एक मोठी संधी दवडल्याची नोंद होईल. संसदेत गोंधळ नव्हे, तर गांभीर्य; घोषणाबाजी नव्हे, तर चर्चा याच मार्गाने लोकशाही सुरक्षित राहू शकते.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व संसदरत्न खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे मुख्य नेते मा. ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब व संसदरत्न मा. खा. श्री. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीमंत योगी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा राजीव नगर बहिरवाडी बीड येथे शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप तसेच क्रिकेट, रनिंग, कबड्डी, खो-खो, रांगोळी, निबंध, हस्ताक्षर, चित्रकला स्पर्धांचे आयोजन करून विजयी खेळाडूंना बक्षीस वितरण कार्यक्रम शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख मा. श्री. मनोजजी शिंदे साहेब यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना आयोजक तथा शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत नवले यांनी आपल्या मनोगतामध्ये शिवसेनेच्या स्थापनेपासून आम्ही सदैव शिवसेनेसोबत असून यापूर्वी शिवसेनेचा जिल्हाप्रमुख असताना संपूर्ण जिल्ह्यात शहरासह गाव, वाडी, वस्ती, तांडा, इत्यादी ठिकाणी जाऊन शिवसेनेचे विचार सर्व सामान्य जनते पर्यंत पोहोचण्यासाठी गावोगावी शिवसेना शाखा स्थापन करून सामना हे वृत्तपत्र संपूर्ण जिल्हाभर पोहोचविण्याचे कार्य केले बीड जिल्ह्याच्या विकासामध्ये शिवसैनिकांचं आणि शिवसेना लोकप्रतिनिधींचा भरीव असं काम आहे मग ते सिंचन, रस्ते बांधकाम, विज , इरिगेशन, पाणीपुरवठा योजना क्रीडा संकुले, आदींसह भरीव काम असल्याचे सांगितले त्याचबरोबर जिल्हाभरातील तीन नगरपालिका चार पंचायत समिती तसेच बीड जिल्हा परिषद सुद्धा शिवसेना आणि मित्र पक्षांकडे होती. तसेच शाळा, महाविद्यालय, झुणका भाकर केंद्र विविध शैक्षणिक संस्था अठरापगड समाजातील कार्यकर्त्यांना मिळवून देवून शासकीय ठेकेदारी काय असते हे कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष कामांच्या वर्क ऑर्डर देऊन शिकविले असल्याचे सांगितले. तसेच या आठवड्यामध्ये जिल्हा रुग्णालय बीड व उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे कर्करोग मुक्त बीड जिल्हा असे



अजिंक्य मुळे आणि जिल्हा शिवसेना मिळून दोन कार्यक्रम घेतले यासाठी मुंबईवरून तज्ञ डॉक्टर बोलावले होते. येत्या नऊ तारखेला गेवराई येथील रुग्णालयामध्ये व शिवसेनेच्या शहर शाखेमध्ये भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले आहे तसेच शिवसेना पदाधिकारी आपल्या विभागांमध्ये समाजोपयोगी उपक्रम राबवत आहेत. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. श्री. मनोजजी शिंदे साहेब यांनी आपल्या भाषणामध्ये स्वर्गीय दिघे साहेबांना स्मरण करून भाषणाला सुरुवात केली यावेळी त्यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख श्री. अनिल दादा जगताप व शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत आप्पा नवले यांचे भरभरून कौतुक केले हा कार्यक्रम तर मी संमती दिली आणि लगेच काही तासातच यशस्वीरित्या कार्यक्रमाचे आयोजन केले. तसेच त्यांच्या अनुभवाची आणि कार्यकुशीलतेची प्रशंसा करत मा. ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब हे नेहमी सांगत असतात या समाजामध्ये काम करत असताना बाळासाहेबांनी दिलेले विचार आणि स्वर्गीय आनंद दिघे साहेबांनी दिलेली शिकवण यामध्ये ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण. आता मी वेळोवेळी सगळीकडे फिरत असतो मी शहरांमध्ये शाळा पाहिलेले आहेत परंतु खेड्यापाड्यांमध्ये आणि ग्रामीण भागामध्ये शाळा चालवणं पाहिजे एवढं सोपं नाहीये परंतु चंद्रकांत नवले यांचे मी कौतुक करतो की त्यांनी ग्रामीण भागामध्ये एक चांगला प्रयत्न केलेला आहे आणि निश्चितच भविष्यामध्ये याचा वटवृक्ष झाल्याशिवाय राहणार नाही असा मला दृढविश्वास वाटतो. शिवसेना हा एकमेव पक्ष आहे जो कला, क्रीडा, सांस्कृतिक विभागाला जास्त महत्त्व देतो. मा. ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब यांचा वाढदिवस महाराष्ट्रातच नव्हे तर देशभर साजरा होतो आहे. हा वाढदिवस साजरा करत असताना सर्व विद्यार्थी उत्साही आणि आनंदात दिसत आहेत. संस्थेचे अध्यक्ष ॲड. चंद्रकांत नवले यांची सुद्धा तळमळ आणि उत्साह पाहून मला पण फार आनंद झाला. चंद्रकांत नवले यांना असं वाटत होतं की आज आपल्या शाळेवर स्वतः साहेब येत आहेत शिवसेनेचे सर्व पदाधिकारी येतायेत महिला पदाधिकारी येत आहेत सर्व मान्यवर येत आहेत आणि माझ्या मुलांचं आज खऱ्या अर्थाने कौतुक होणार आहे त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडणार आहे अशी मानसिकता असणारा नेता सुद्धा समाजामध्ये असणं गरजेचं आहे आणि असा नेता मला चंद्रकांत आप्पा मध्ये दिसला. म्हणून त्यांना जो आनंद त्यांच्या चेहऱ्यावर जो मी आनंद पाहिला त्यामुळे मला पण एक समाधान वाटलं. मला सर्व जिल्हाप्रमुखांचा अभिमान वाटतो. बीड जिल्हा काही पक्षाच्या माध्यमातून विस्कळीत झालेला आहे. त्याची सुटका करण्याची जबाबदारी करण्याची आपणाकडे आणि सर्व पदाधिकारी यांच्याकडे आहे. तसं पाहिलं तर पत्रकार हे राजकारणामध्ये कधी सहभाग घेत नाहीत परंतु मी पाहिलं या दोन्ही कार्यक्रमांमध्ये पत्रकार मंडळी मोठ्या ताकदीने शिवसेनेच्या मागे उभा आहे आणि त्याचा मला सार्थ अभिमान आणि कौतुक वाटते. असा कार्यक्रम क्वचितच लोक साजरा करतात जो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेल. या दोन्ही कार्यक्रमांचे फोटो आणि ते मी पदाधिकाऱ्यांना मागितले ते यासाठी मागितले की एकनाथरावजी शिंदे साहेब लाडक्या बहिणीसाठी गोरगरिबांसाठी कष्टकऱ्यांसाठी जे श्रम करत आहेत १८-१८ तास काम करत आहेत ते काय वाया गेलेले नाही तुमचा वाढदिवस हा विद्यार्थी छोटे छोटे विद्यार्थी विद्यार्थीनी ऊन असून सुद्धा मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरा करत आहेत तुमचे श्रम आणि परिश्रम कधीही वाया जाणार नाहीत गेले नाहीत हे आज मी प्रत्यक्ष या श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज शाळेवर आल्यानंतर मला दिसलं. यापूर्वी अनेक मुख्यमंत्री होऊन गेले परंतु शिंदे साहेब हे असे व्यक्तिमत्व आहे जे नेहमी एसी रूम मध्ये न बसता सर्वसामान्य लोकांमध्ये मिसळून रस्त्यावरच जास्त दिसतात. कोणाचा एक्सीडेंट झाला तर ते स्वतःची गाडी त्याला देतात. आज शिंदे साहेब जरी उपमुख्यमंत्री दिसत असले किंवा ते मुख्यमंत्री जरी होते तरी ते काय त्यांचा प्रवास एवढा काही साधा आणि सोपा नव्हता एक शिवसैनिक, शिवसेना शाखाप्रमुख, शिवसेना जिल्हाप्रमुख, आमदार, मंत्री आणि मुख्यमंत्री हे काय सोपी गोष्ट नव्हती दिवस-रात्र आणि हाडांची काढ त्यांनी केली जनतेसाठी जनतेचा आणि सर्व महाराष्ट्राचा विश्वास त्यांच्यावरती आहे जेव्हा पहलगामला हमला झाला त्यावेळी स्वतः शिंदे साहेबांनी जाऊन तिथे पिडीत मराठी बांधवांना मदत केली त्यांचं सांत्वन केलं आणि जे बचावले होते त्यांना घेऊन येण्याचं काम सुद्धा माननीय साहेबांनी केले गरिबाच्या मागे ताकतीने उभा राहण्याचं काम मा. ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब करत असतात. असा नेता या भारत वर्षामध्ये मला तरी वाटतं झाला नसेल एवढं मोठं नेतृत्व आपल्याला मिळालेला आहे. मला तुम्हा सर्व जिल्हाप्रमुखांचा सार्थ अभिमान वाटतो आणि एकनाथ शिंदे साहेब श्रीकांत शिंदे साहेब हे सुद्धा बीड जिल्ह्यातील शिवसैनिकावर तेवढेच प्रेम करतात त्यांची त्यांचं बीड जिल्ह्याकडे तेवढेच लक्ष आहे हे सुद्धा मी जाणतो डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांचं संसदेमध्ये उल्लेखनीय कार्य त्यांना संसदरत्न ते आहेत परंतु ज्यावेळेस मंत्रीपद देण्याचा प्रसंग आला त्यावेळेस त्यांनी स्वतःच्या मुलाला न देता अन्य शिवसेनेतील नेत्यांना मंत्रीपद दिले अशा प्रकारचे नेतृत्व सर्व मा. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब आपल्याला लाभलेले आहेत हे आपल्या सर्वांचे भाग्य आहे सुदैव आहे. शिवसेनेमध्ये जो काम करेल तोच पक्षाचा राजा आहे अशा प्रकारचे विचार घेऊन चालणारा हा नेता आहे मला या ठिकाणी मनस्वी आनंद झाला कारण की लोक वाढदिवस साजरा करतात जेवण देतात पार्टी करतात धांगडधिंगा करतात परंतु अशा प्रकारचा वाढदिवस आपण साजरा केला त्याबद्दल मी शिंदे साहेबांच्या वतीने तुमचे आभार मानतो आणि सामाजिक काम करत चला आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. त्यापैकी काम म्हणजे आज विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग आणि अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी गणेश वाटप तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करून बक्षीस वितरण कार्यक्रम घेतला त्याबद्दल समाधान व्यक्त करून केलेल्या उपक्रमांची माहिती मा. एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्यापर्यंत पोहोचविणार असल्याचे सांगितले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक, शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल भैया गलधर, छावाचे जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा रोमन, गिरीश करवा, पप्पू शिंदे, महिला आघाडीच्या संपर्क प्रमुख संगीता ताई चव्हाण, शिवसेनेच्या फरजाना शेख, गेवराई शहर प्रमुख मुकेश महाजन, शेतकरी सेना जिल्हाप्रमुख ॲड. बापूसाहेब जाधव, शिवसेना नेते सुनील सुरवसे, शिवसेना तालुकाप्रमुख संतोषजी किसनराव जाधव, बीड शहर प्रमुख गजानन कदम, जिल्हा सचिव सुनील भाऊ अनुभुले शिवसेना उपजिल्हाप्रमुख नारायण शिंदे, शिवसेना नेते विक्रमराजे भोसले, तालुकाप्रमुख बाळासाहेब खेडकर, नगरपरिषद बीड बांधकाम सभापती संजय भाऊ उडान, नगरसेविका शितलताई चक्रे, नगरसेवक सुरज चुंगडे, नगरसेवक मनोज गोडसे, नगरसेवक जैतुल्ला खान, माजी सभापती अमोल पौळ, संजय गोडसे, बापू जाधव, संपादक वैभवजी स्वामी, संस्थेचे उपाध्यक्ष शिवाजीराव गायकवाड, संस्थेचे सचिव विश्वनाथ उर्फ राजेंद्र गुप्ते,पोपट घाडगे, भागवत बादाडे, सचिन पाटील कुर्ला, रुस्तुम बेद्रे, गणेश जाधव, बालाजी गायकवाड, अबू उपळकर, योगेश कुंभारकर,सिराज पठाण, खान साहेब, प्रा. सचिन उबाळे, योगेश नवले, सचिन टेकाळे, शेतकरी सेनेचे संदीप सोनवणे, राजेश दादा नवले, सेजलताई नवले, संजय नाना नवले, मुक्ताराम आहेर, प्रकाश नरनाळे, गणेश पवार, बिबीशन मोघे, उमेश शिंदे, शिवराज उगले, स्वप्निल आबूज सह शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एक लाख बावीस हजारच्या बनावट नोटांसह पाच जणांची टोळी पकडली

**अंबड । प्रतिनिधी**

सदरील घटना मालेगाव नाशिक येथे २३ जानेवारी रोजी एक व्यक्ती बँकेमध्ये बनावट नोटा ५० हजार रुपये भरणा करण्यासाठी गेला असता सदरील बँक कॅशियर यांच्या लक्षात आल्याने सदरली माहिती मालेगाव नाशिक पोलीस दिली होती या प्रकरणी तिथे गुन्हा दाखल करण्यात आला होता परंतु पुढील तपास सुरू असताना योग्य तपास मालेगाव नाशिक पोलीस कडून करण्यात आला नसल्यामुळे त्याच अंबड पोलिसांनी अंबड मध्ये कारवाई करून पाच आरोपी वर कारवाई केली यानंतर पुढील तपास करण्यासाठी अंबड पोलिसांचे पथक रवाना झालं नंतर नाशिक मालेगाव पोलिसांनी संभाजीनगर इथून बनावट नोटा छापाचं प्रिंटर मुख्य एक आरोपी ताब्यात घेऊन अटक केली असल्याची माहिती अंबड पोलिसांकडून देण्यात आली. जे नाशिक मालेगाव या पोलिसांना जमलं नाही ते अंबड पोलिसांनी करून दाखविले यामुळे बनावट नोटा तयार करणारी टोळी व चलन मध्ये वापरणारे आरोपी अंबड पोलिसामुळे पकडले गेले.

दिनांक ०६/०२/२०२६ रोजी पोलीस स्टेशन अंबड येथे कार्यरत असलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी हे नियमित कर्तव्यावर



असताना पोलीस निरीक्षक श्री. घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, अंबड शहर परिसरात काही इसम भारतीय चलनातील ₹५०० दराच्या बनावट नोटांची खरेदी-विक्री करीत आहेत. सदर माहितीच्या आधारे पोलीस पथकाने दोन पंचांना सोबत घेऊन शोध मोहीम राबविली, त्यावेळी अंबड-पाचोड रोड परिसरात विकास अनिल गडगुळ वय २६ वर्षे व्यवसाय पेंटर राहणार शिवाजीनगर, महाराष्ट्रव्दार जवळ, अंबड ता अंबड जि जालना व एका विधीसंघर्षग्रस्त बालकांस ताब्यात घेऊन पंचासमक्ष झडती घेतली असता त्यांच्या ताब्यातून ₹५०० दराच्या बनावट भारतीय चलनी नोटा मिळून आल्या. तपास दरम्यान आरोपी विकास अनिल गडगुळ याने सदर बनावट नोटा समरवीर सुनील खरात (वय २१ वर्षे, रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, अंबड) याच्याकडून खरेदी केल्याचे सांगितल्याने त्याचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेतले असता त्याच्याकडून देखील ₹५०० दराच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या. पुढील चौकशीत आरोपी समरवीर खरात याने सदर बनावट नोटा आकाश नारायण शेळके (वय २८ वर्षे, रा. लोढी मोहल्ला, जालना) व आदित्य अमित गायकवाड (वय १९ वर्षे, रा. संभाजीनगर) यांच्याकडून घेतल्याचे निष्पन्न झाले असुन इतर फरार आरोपींचा शोध सुरु आहे. त्यानुसार पोलीस पथकाने सर्व आरोपींना शोधून पंचासमक्ष झडती घेतली असता त्यांच्या ताब्यातून एकूण ₹५०० दराच्या २४४ बनावट भारतीय चलनी नोटा, एकूण किंमत रुपये १,२२,०००/- इतक्या जप्त करण्यात आल्या. तपासात आरोपींनी बनावट चलनाचा वापर व प्रसार करण्याच्या उद्देशाने सदर नोटांची खरेदी-विक्री केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरची कारवाई श्री. अजयकुमार बन्सल (मा. पोलीस अधिक्षक ,श्री. आयुष नोपानी (मा.अपर पोलीस अधिक्षक , श्री. सिद्धेश्वर धुमाळ (उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबड) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. संतोष घोडके व त्यांच्या पथकातील पोउपनि/ बी. बी. नरोडे, पोहेकों /११६९ यशवंत मुंढे, पोहेकाँ/१२७२ चव्हाण, पोअं/३४४ मुंढे, पोअं/, पोअं/४९६ केंद्रे, पोअं/१६३३ राऊत यांनी केली असून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १७९, १८० व इतर संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बीड येथे प्रभू विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

तळेगाव येथे शनिवार दि.३१/१/२०२६ रोजी प्रभू विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली,या निमित्ताने मंदिरांत विविध उपक्रम राबविले, यादिवशी सकाळी आठ वाजता श्रींचा अभिषेक करण्यात आला, अकरा ते एक ह.भ.प. जगन्नाथ महाराज सांगळे, महाकाळा यांचे सुश्राव्य आसे किर्तन पार पडले, किर्तनात महाराजांनी समाजाच्या भावी पिढी सुदृढ व निरोगी राहण्यासाठी मार्गदर्शन केले किर्तनानंतर आलेल्या सर्व भाविकांना महाप्रसाद वितरण करण्यात आला



आणि महाप्रसादाचा संपूर्ण खर्च पंढरीनाथ क्षिरसागर व कांतीलाल क्षिरसागर बंधूंनी केला ,या कार्यक्रमाला शहरातील प्लायवूड/हार्डवेअर/फेविकॉल कंपनीचे डीलर्स व समाजातील सर्व लहान थोर मंडळी उपस्थित होती,हा उत्सव यशस्वी होण्यासाठी समाजातील सर्व तरुण व जेष्ठ मंडळी ने परीश्रम घेतले या कार्यक्रमाला हजारोंच्या संख्येने भाविक उपस्थित राहीले सर्वांचे आभार श्री राजू पांचाळ यांनी केले.

# पान १ वरून...

## व्यापार करार भारताच्या

सांगितले. जयराम रमेश यांच्या मते, या करारामुळे अमेरिकन शेतकऱ्यांना फायदा होईल, पण भारतीय शेतकऱ्यांचे नुकसान होऊ शकते. भारत अमेरिकेतून होणारी आयात मोठ्या प्रमाणात वाढवणार असून, त्यामुळे भारताची निर्यात कमी होईल. भारत आणि अमेरिका यांच्यात परस्पर फायद्याचा व्यापार वाढवण्यासाठी हा करार करण्यात आला आहे. या करारामुळे दोन्ही देशांमधील व्यापाराला वेग मिळणार आहे. तसेच अमेरिकेने भारतातून जाणाऱ्या काही विमान आणि त्याच्या सुट्या भागांवरील आयात शुल्क हटवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या क्षेत्रातील व्यापाराला चालना मिळण्याची शक्यता आहे.

----------

## १२ जि.प.१२५ पंचायत

५२ टक्के, सांगली ५२.४७ टक्के, परभणीत ५८.७१ टक्के मतदानाची नोंद झाल्याचे सांगण्यात आले. छत्रपती संभाजीनगरमध्ये जिल्हा परिषदेच्या मतदानाला सुरुवात होण्याआधी शिवसेनेच्या उमेदवाराकडून हळदी, कुंकू लावून ईव्हीएमची पूजा करण्यात आली. या प्रकरणाची जिल्हाधिऱ्याकडून दखल घेण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातील रांजणगाव येथे भाजपने बोगस मतदार आणल्याचा आरोप करण्यात आला. तर रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूणसह काही ठिकाणी सकाळच्या सत्रात ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याने मतदारांना रांगेत ताटकळत उभे राहावे लागले. परभणी जिल्ह्यातील बोथ आणि बोथ तांडा गावांतील लोकांनी मतदानावर बहिष्कार टाकला. या दोन्ही गावांतील एकाही गावकऱ्याने ४ वाजले तरी मतदानाच्या अखेरच्या टप्प्यात मतदान केले नव्हते. दरम्यान, तहसीलदारांनी संबंधित गावांमध्ये जाऊन गावकऱ्यांची भेट घेत त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. पण रस्ता, पूल पूर्ण होईपर्यंत आम्ही मतदान करणार नाही, या भूमिकेवर ग्रामस्थ ठाम राहिले. सांगली जिल्ह्यातील बलगवडे गावातील ग्रामस्थांनीही मतदानावर बहिष्कार टाकला. येथे दुपारपर्यंत एकही मतदान झाले नव्हते. येथील ग्रामस्थांनी सौरऊर्जा प्रकल्पासाठी वृक्षतोड केल्याच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. यामुळे त्यांनी मतदान न करण्याचा निर्णय घेतला.

----------

## एकनाथ खडसेंना कोर्टाने

खडसे यांच्यावर आरोप निश्चित केले जाणार होते. मात्र, सुनावणी दरम्यान एकनाथ खडसे आणि मंदाकिनी खडसे हे दोघेही न्यायालयात गैरहजर राहिले. या अनुपस्थितीची गंभीर दखल घेत विशेष न्यायालयाने त्यांच्या विरोधात थेट अजामीनपात्र वॉरंट बजावले आहे. या खटल्याला अंतरिम स्थगिती देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने आधीच नकार दिला आहे. त्यामुळे सत्र न्यायालयातील कारवाई सुरूच आहे. खडसेंचे जावई गिरीश चौधरी यांचा जामीन अर्जही नुकताच फेटाळण्यात आला असून, ते सध्या कोठडीत आहेत. आता १३ फेब्रुवारी रोजी या प्रकरणाची पुढील सुनावणी होणार असून, त्या दिवशी खडसे न्यायालयात हजर राहतात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

-------------

## सात वर्षांपर्यंत शिक्षेच्या गुन्ह्यांत

केले. न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती एन. कोटिश्वर सिंग यांच्या खंडपीठाने सांगितले की, सात वर्षांपेक्षा कमी शिक्षेच्या गुन्ह्यांत पोलिसांनी प्रथम कलम ३५(३) अंतर्गत नोटीस बजावणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया न पाळता थेट अटक केल्यास ती कायदेशीर ठरणार नाही, असा स्पष्ट इशाराही न्यायालयाने तपास यंत्रणांना दिला. अटक ही 'विवेकाधीन आणि ऐच्छिक' कारवाई असून ती प्रकरणातील परिस्थिती पाहूनच केली पाहिजे, असे न्यायालयाने नमूद केले. अटक करण्याचा अधिकार असला, तरी तो अत्यंत खबरदारीने आणि अपवादात्मक परिस्थितीतच वापरावा, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. खंडपीठाने म्हटले की, बीएनएसएस २०२३ च्या कलम ३५(१)(ब) अंतर्गत अटक करण्याची कारणे उपलब्ध असली, तरी ती पूर्णतः आवश्यक नसेल, तर अटक टाळली पाहिजे. सात वर्षांपर्यंत शिक्षेच्या गुन्ह्यांत अटक ही योग्य, कारणयुक्त आणि पारदर्शक असणे गरजेचे आहे, असे न्यायालयाने अधोरेखित केले.

------------

## बीड जिल्ह्यातील संत महंताकडून

महंतांनी वाहिली. यावेळी खासदार शरद पवार व अजितदादा पवार यांचे पुत्र पार्थ पवार, जय पवार उपस्थित होते. त्यासोबतच बीड जिल्ह्यात धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज, नेकनूर येथील बंकट स्वामी महाराज मठाचे महंत मेंगडे महाराज, आईसाहेब संस्थान महासांगवी तालुका पाटोदा या संस्थानाच्या हभप राधाताई सानप, हभप नाना महाराज कदम, हभप सुरेश महाराज जाधव आदी उपस्थित होते. यानंतर राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनिता ताई पवार यांचीही भेट घेऊन संत महंतांनी त्यांचे सांत्वन केले.

-------------

## अपघाताविषयी महाराष्ट्र

सामान्य व्यक्ती नव्हते. अहवाल सांगेल तांत्रिक चूक होती व वैमानिकाचा अंदाज चुकला, तर जनता मान्य करेल? महाराष्ट्र पुरावा मागतोय! विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेज प्रसारित करून अजितदादांच्या आगमनापासून विमानात बसेपर्यंत प्रत्यक्षदर्शी पुरावा सादर करावा. अंजली दमानिया यांनी दुःखाच्या क्षणी केलेली विधाने अत्यंत दुर्दैवी आणि असंवेदनशील आहेत, अशी टीका अमोल मिटकरी यांनी केली आहे. अजितदादांच्या अपघाती निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हादरलेला असताना जाणीवपूर्वक संशय निर्माण करणे हा केवळ राजकीय हेतूने प्रेरित प्रयत्न आहे. या कठीण आणि भावनिक काळात शब्दांचा विपर्यास करून वातावरण दूषित करण्याऐवजी, दुःखात सहभागी होणे अपेक्षित होते. तथ्यांशिवाय आरोप करणे हे ना माणुसकीला शोभते, ना जबाबदार सार्वजनिक भूमिकेला. अंजली दमानिया यांच्या असंवेदनशीलतेचा निषेध व धिक्कार असल्याचे अमोल मिटकरी यांनी म्हटले आहे.

-------------

## १२ लाखाची फसवणूक

केला आणि आरटीजीएसद्वारे वेळोवेळी रक्कम जमा केली. करारानुसार ठरलेला माल तपासण्यासाठी मुथा साताऱ्याला गेले असता, तिथे दाखवल्याप्रमाणे चांगल्या दर्जाचा माल उपलब्ध नव्हता. तडजोड म्हणून त्यांनी २५ टनाची नवीन ऑर्डर दिली आणि एकूण २६ लाख ३१ हजार रुपये जमा केले. मात्र, आरोपींनी ३० ऑगस्ट २०२५ रोजी केवळ १२ टन माल पाठवला, जो अत्यंत निकृष्ट दर्जाचा होता. त्यामध्ये भेसळ, माती आणि पेरणीसाठी अयोग्य साहित्य मोठ्या प्रमाणात होते. उर्वरित मालासाठी किंवा पैसे परत मिळवण्यासाठी मुथा यांनी वारंवार संपर्क केला असता, आरोपींनी पैसे देण्यास नकार दिला आणि अर्वाच्य भाषेत उत्तरे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सुयश मुथा यांनी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी संजय ाबासाहे भगत, ओंकार संजय भगत, अरविंद सोपान विधाते, सारीका सोमनाथ शिंदे, बालुताई सोमनाथ जगताप आणि बालकृष्ण पंढरीनाथ चव्हाण या ६ संचालकांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

---------------

## महायुतीत वादाच्या

केल्याचा दावा कदमांनी केला. ज्या माउलीचे कुंकू आणि मंगळसूत्र गेले, त्यांना सुतकही पाळू दिले नाही, मुंबईला आणून शपथविधी करायला लावणाऱ्या तटकरेंना महाराष्ट्र कधीही माफ करणार नाही, अशी टीका त्यांनी केली. महायुतीत दोन्ही पक्ष असूनही कदम यांनी टिका केल्याने महायुतीत वाद वाढण्याची शक्यता आहे. ज्यांनी त्यांना मोठं केले, त्यांनाच संपवण्याचे काम ते करतात. माझ्या मुलाला (योगेश कदम) राजकारणात संपवण्याचा प्रयत्न ज्यांनी केला, त्यांच्याकडून दुसरी काय अपेक्षा करणार.? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. रामदास कदम यांनी तटकरेंवर विश्वासघात केल्याचा आरोप करताना जुन्या कुरघोड्यांची आठवण करून दिली. लोकसभा निवडणुकीत सुनील तटकरेंना खासदार करण्यासाठी आम्ही अहोरात्र कष्ट केले. मात्र, विधानसभेच्या वेळी त्यांनीच आम्हाला दगा दिला. असा आरोपही कदमांनी केल्यामुळे महायुतीत वाद पेटण्याची शक्यता आहे.

---------------

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. ८ फेब्रुवारी २०२६



## थोडक्यात

### ढेकणमोहा येथे माता रमाई जयंती साजरी

ढेकणमोहा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथील मातोश्री रमाबाई आंबेडकर सेवाभावी संस्था ढेकणमोहा येथे बहुजनांची माऊली त्यागमूर्ती माता रमाई जयंती साजरी करण्यात आली या वेळी माता रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेचे पूजन करण्यात आले. माता रमाबाई आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यागमूर्ती रमाईंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्यात सावलीसारखे राहून,अत्यंत गरिबीत व संघर्षात संसार सांभाळला. या माता रमाई जयंतीच्यानिमित्ताने अभिवादन करण्यात आले. यावेळी जेष्ठ महिला गंगुबाई शिंदे, व कमलबाई शिंदे, शुभांगी शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले या प्रसंगी प्रमुख उपस्थिती जेष्ठ नेते हानुमान देवकते, कैलास देवकते, नागेश शिंदे, परमेश्वर थापडे (उपसरपंच) भारत देवकते (शिवसेना बीड तालुका उपाध्यक्ष), भाजपाचे नेते शामराव राऊत, नारायण देवकते (ग्रामपंचायत सदस्य) देवानंद शिंदे (ग्रामपंचायत सदस्य), शरद देवकते (ग्रामपंचायत सदस्य) गणेश कोकाटे, प्रकाश शिंदे सर ,सुदाम शिंदे ,कचराअप्पा शिंदे ,भगवान शिंदे, दराराज शिंदे ,अरविंद शिंदे ,बापुराव शिंदे ,अभिजीत शिंदे, शुभांगी शिंदे ,सुमनबाई शिंदे (ग्रामपंचायत सदस्य )निर्मला शिंदे, पदमीन शिंदे ,सोनाली शिंदे, मंगल शिंदे, कांताबाई शिंदे, कैकई शिंदे, दैवशाला साळवे, आम्रपाली शिंदे, हार्षनी शिंदे, विमल शिंदे ,शितल शिंदे, भाग्यश्री शिंदे, आसराबाई शिंदे, दोरकाबाई काळे, साक्षी शिंदे आदीची उपस्थित होते.



### राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये कमवा व शिका योजनेच्या विद्यार्थ्यांना धनादेशाचे वाटप



किल्ले धारूर । प्रतिनिधी

राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यार्थी विकास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या कै. वसंतरावजी काळे स्वाभिमान शिक्षण कमवा आणि शिका योजनेच्या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉक्टर गोपाळ काकडे यांच्या हस्ते रुपये १,०००/- (अक्षरी एक हजार) धनादेश वाटप करण्यात आले. यामध्ये वैष्णवी अशोक साळवे, सायली जगदीश हेडगिरे, दिव्या रमेश गायकवाड, इरले शामल रत्नाकर, देवकर पल्लवी ज्ञानेश्वर, सम्राट संजय शिंदे, रितेश गौतम शिरसाट, ऋतिक ईश्वर शिरसाट, बंडगर निखिल, ओम वैजनाथ सुरोशे, कृष्णा रामविलास मुंडे, अमन असद बेग, लक्ष्मी आदेश मिसाळ, मनोज गुंडीबा मोरे, शिवकन्या अनंत कुचेकर या विद्यार्थ्यांना चेक प्रदान करण्यात आले. विद्यार्थ्यांनी वर्षभर महाविद्यालय परिसराची स्वच्छता, औषधी वनस्पती उद्यान, ग्रंथालय व इतर तस्सम स्वरूपाची कामे केली. या प्राप्त रकमेचा उपयोग विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कार्यासाठी करावा असे आवाहन प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, समन्वयक प्रा. नागोराव वाघमारे, सदस्य प्रोफेसर डॉ. अशोक लाखे, डॉ. नितीन कुंभार, कार्यालय अधीक्षक श्री. सुभाष वायाळ यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजा हरिश्चंद्र महाशिवरात्र महोत्सवाची सोमवारपासून सुरुवात

## राज्यातील नामवंत कीर्तनकारांची लाभणार हजेरी; महंत भगवान बाबा राजपूत यांचे सुंदर नियोजन

वडवणी प्रतिनिधी

भारत देशातील राजा हरिश्चंद्राचे एकमेव मंदिर असणारे ठिकाण बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यात राजा हरिश्चंद्र पिंपरी येथे आहे. या तीर्थस्थळावर दरवर्षीप्रमाणे या वर्षीही राजा हरिश्चंद्र शिवरात्र महोत्सवाची सुरुवात सोमवार ०९ फेब्रुवारी पासून होत असून या शिवरात्र महोत्सवात राज्यातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत. या सोहळ्याची पूर्ण तयारी झाली असून बीड जिल्ह्यासह राज्यातील भाविकांनी राजा हरिश्चंद्राच्या दर्शनाचा आणि महाशिवरात्र महोत्सवातील कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन या तीर्थक्षेत्राचे महंत भगवान बाबा राजपूत यांनी केले आहे.

सत्यवादी, न्यायनिष्ठ राजा तसेच स्वप्नात राज्य दान देणारा दानशूर राजा म्हणून ख्याती असलेले राजा हरिश्चंद्राचे एकमेव मंदिर बीड जिल्ह्यातील वडवणी जवळील राजा हरिश्चंद्र पिंपरी येथे आहे. या तिर्थस्थळावर संत भगवान बाबा यांनी महाशिवरात्र महोत्सवाची सुरुवात केली होती. त्यांचे उत्तराधिकारी संत भिमसिंह बाबा यांनी ही परंपरा आयुष्यभर चालवली. आता भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज यांच्या आधिपत्याखाली या तीर्थ स्थळाचे महंत भगवान बाबा राजपूत यांच्या नेतृत्वाखाली ही परंपरा चालू आहे. यावर्षी या ठिकाणी महाशिवरात्र महोत्सवाचे आयोजन केले असून जय्यत तयारी करण्यात आली आहे. राज्यातील नामवंत कीर्तनकार या महोत्सवात आपली हजेरी लावून कीर्तने करणार आहेत. सोमवार दि. ०९ फेब्रुवारी रोजी महोत्सवाची सुरुवात होत असून १६ रोजी राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे महंत भगवान बाबा राजपूत यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे. ०९ रोजी रात्री श्री.हभप. भगीरथ महाराज काळे (सिन्नर), १० रोजी श्री हभप. जयेश महाराज भाग्यवंत (मुंबई), ११ रोजी श्री.ह.भ.प. तुकाराम महाराज मुंडे (परळी वें.), १२ रोजी श्री.ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकीकर (जळगांव), १३ रोजी श्री.ह.भ.प. कोमलसिंग महाराज (धुळे), १४ रोजी श्री.ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) १५ रोजी महाशिवरात्रीला श्रीक्षेत्र भगवानगडाचे उत्तर अधिकारी श्री.ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री (श्रीक्षेत्र भगवान गड) यांची कीर्तन सेवा होणार असून दिनांक १६ रोजी सकाळी ११:०० ते १:०० या वेळेत महंत भगवान बाबा राजपूत यांच्या काल्याच्या कीर्तनाने या महोत्सवाची सांगता होणार आहे. यावेळी आलेल्या भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. या महोत्सवाचा लाभ



घ्यावा असे आवाहन महंत भगवान बाबा राजपूत यांच्यासह परिसरातील राजा हरिश्चंद्र पिंपरी पंचक्रोशीतील गावकऱ्यांनी केली आहे.

**वडवणी तालुक्यातील गावकरी कार्यक्रमाचे यजमान**

राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्र हे जगभरात केवळ वडवणी तालुक्यात आहे. या तीर्थक्षेत्रावरील हा कार्यक्रम धुमधडाक्यात व्हावा या उद्देशाने वडवणी तालुक्यातील सर्व गावकरी या कार्यक्रमाचं यजमानपद घेतात. तालुक्यातील हरीचंद्र पिंपरी परिसरातील पिंपरखेड, साळींबा, मामला, कान्हापुर, लक्ष्मिपुर, देवगाव, देवडी, खळवट लिमगाव, परडी, माटेगाव, चिंचाळा, खापरवाडी, दुकडेगाव, चींचोटी, कवडगाव, मोरेवाडी, बाहेगव्हाण, वडवणी, मोरवड, तीगाव, पुसरा, कुप्पा आदी अनेक गावकरी या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी झटणार आहेत.

**तरुणांची फौज**

हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी राजा हरिश्चंद्र पिंपरी आणि पंचक्रोशीतील शेकडो तरुण या ठिकाणी आपली कामे सोडून वाढ करण्यासाठी, स्वच्छता करण्यासाठी, तसेच आलेल्या भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी या ठिकाणी मेहनत घेत असतात. या तरुणांच्या फौजेमुळे या ठिकाणी आलेल्या सर्व भाविकांचे संरक्षणही होत असते.

**भरत पठाडे, रवी पवार, रामानंद ढाले, झुका गुरुजी यांची जुगलबंदी**

राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्रावर सर्वांचं आकर्षण असतं ते मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे, गायनाचार्य रवी महाराज पवार आणि गायनाचार्य रामानंद महाराज ढाले यांच्यावर. ख्यातनाम मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे यांचा मृदंग कडाडताना भाविकांना पाहायला मिळतो या मृदंगावर रवी महाराज पवार, रामानंद महाराज ढाले गुरुजी यांची जुगलबंदी पाहताना भाविकांच्या अंगावर काटा उभा राहतो. कीर्तनकारांपेक्षाही ही मंडळी भाविकांचं मन तल्लीन करून टाकतात. त्याचबरोबर १४.०२.२०२६ रोजी संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत ह.भ.प. देविदास महाराज जाधव उर्फ झुकागुरुजी यांच्या गायनाचा कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्यात प्रकाश महाराज कातकडे, श्री. इंद्रभान महाराज गुरूजी, श्री. विठ्ठल म.महागोविंद, श्री. बाजीराव म. काळे, हरिदास म. पांचाळ, श्री. दत्ता म. सातले, श्री जगन महाराज, पांडुरंग म. काळे, श्री. माऊली म. खोटे, श्री. सचिन म.मुंडे, व पंचक्रोशीतील गायक, वादक सातही दिवस उपस्थित राहणार आहेत.

**महंत हनुमंत महाराज शास्त्री यांचे दररोज ज्ञानेश्वरी प्रवचन**

साल सिद्ध बाबा संस्थानचे महंत ह भ प हनुमंत महाराज शास्त्री यांची दरवर्षी महाशिवरात्र महोत्सवात आठ दिवस उपस्थिती असते या महोत्सवांमध्ये दररोज दुपारी चार ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत ग्रंथराज ज्ञानेश्वरी वर प्रवचन सेवा असते या प्रवचन सेवेला मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. यावर्षी देखील हनुमंत महाराज यांच्या प्रवचन सेवेचा लाभ भाविकांना मिळणार आहे.

## संत भगवान बाबा इंग्लिश स्कूलमध्ये बाल आनंद मेळावा उत्साहात

वडवणी । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक कौशल्य, आर्थिक साक्षरता आणि व्यवहारज्ञानाची रुची निर्माण व्हावी, या उद्देशाने वडवणी शहरातील संत भगवान बाबा इंग्लिश स्कूल येथे आज बाल आनंद मेळावा (आनंद नगरी) आणि पालक मेळाव्याचे शानदार आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी लावलेल्या विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

व्यावहारिक शिक्षणाची अनोखी पाठशाळा

पुस्तकी ज्ञानासोबतच विद्यार्थ्यांना नफा-तोटा, हिशोब आणि ग्राहकांशी संवाद साधण्याचे कसब कळावे, यासाठी या आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार



केलेल्या आणि सजवलेल्या स्टॉल्सवर खवय्यांनी मोठी गर्दी केली होती.

**मान्यवरांची उपस्थिती आणि मार्गदर्शन**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या विद्यार्थ्यांनी सुश्राव्य स्वागतगीताने पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राठोड सर यांनी केले, ज्यामध्ये त्यांनी मेळाव्याचा मुख्य उद्देश स्पष्ट केला.

मुख्य मार्गदर्शक आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक योगेंद्र मुंडे सर यांनी आपल्या भाषणात विद्यार्थी, शाळा आणि पालक यांच्यातील समन्वयावर भर दिला. ते म्हणाले, ''विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी पालकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा उपक्रमांतून मुलांमध्ये आत्मविश्वास आणि व्यावसायिक दृष्टी निर्माण होते.''

**कार्यक्रमास लाभलेले प्रमुख अतिथी:**

श्री. दिलीप तात्या मुंडे, श्री. लक्ष्मणराव घुले, पत्रकार अर्जुन मुंडे, पत्रकार विष्णू डोईफोडे सर, श्री. राहुल उजगरे, श्री. अशोक मुंडे शिक्षक आणि पालकांचा मोठा प्रतिसाद हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक वृंद - सदरे सर, गुरसाळी सर, राठोड सर, राठोड मॅडम, माळवदे मॅडम, घुले मॅडम, काळे मॅडम, कोमटे मॅडम आणि लिंबाजी नागरगोजे यांनी विशेष परिश्रम घेतले. वडवणी परिसरातील पालक, शिक्षणप्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सांगतेवेळी श्रीमती ढवळशंक मॅडम यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि प्रदर्शनाचे महत्त्व विषद केले. या मेळाव्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि उत्साह पाहायला मिळाला.

## पान ६ वरुन...

### कडा येथे सोमवारपासुन

या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी महेश गणेश मंडळ, जय हनुमान गणेश मंडळ, श्रीकृष्ण गणेश मंडळ, जय मल्हार गणेश मंडळ, सावता गणेश मंडळ आणि समस्त कडा ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन श्री महेश मंदिर ट्रस्ट व आयोजकांनी केले आहे.

### कडा कृषी उत्पन्न बाजार समितीत

अनुदान दोन टप्प्यांत ५०:५० प्रमाणात वितरित केले जाणार आहे. उर्वरित खर्च बाजार समितीने स्वनिधी अथवा कर्जातून उभारणे बंधनकारक राहणार आहे. या महत्त्वपूर्ण प्रकल्पामुळे शेतकऱ्यांच्या सोयीसुविधांमध्ये भर पडणार असून, यासाठी राज्य शासन, आमदार सुरेश धस तसेच कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्वत्र कौतुक व आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

### विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी

व उच्च माध्यमिक आश्रम शाळा राजीव नगर बहिरवाडी, बीड या शाळेत श्री. सय्यद शोएब (बाबा सर) यांनी मोबाईल मुक्त अभियान या उपक्रमाचे आयोजन केले या कार्यक्रमास श्री. भोसले सर, श्री. परकाळे सर, मुख्याध्यापक श्री. भडके सर आणि श्री. सय्यद शोएब(बाबा सर ) यांनी उपस्थित सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना मोबाईल पासून होणारे दुष्परिणामाबद्दल माहिती दिली. यावेळी...... माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. धुमाळ सर, पर्यवेक्षक श्री. गायकवाड सर, श्री. जाधव सर, श्री. गोल्हार सर, श्रीमती. पवळ मॅडम, श्री. शेळके सर, श्री. शिंदे सर अधीक्षक श्री. नवले सर, श्री. तळेकर सर, श्री. महाडिक सर. श्री. दिलावर खान ,आयन सय्यद , शेख शाफीन, शेख कैफ,शेख रेहान , सैफ ईनामदार , के.के बेग साहब.व शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. पालकांनी या उपक्रमाचे स्वागत केले असून मुलांनी शाळेत मोबाईल न घेऊन जाण्याचे सक्ती केली आहे.

### स्वच्छ, सुंदर बीडसाठी

आहेत, त्यामुळे आता शहरातील जनतेला पालिकेच्या माध्यमातून मुलभूत सुविधा मिळायलाच हव्यात, या सुविधा मिळवून देण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत. रस्ते, नाल्या व पाणी पुरवठ्याबरोबरच शहरातील स्वच्छता नियमित होणे महत्वाचे आहे. यासाठी ही विशेष मोहिम राबवणे गरजेचे आहे, यात कसलीही दिरंगाई नको अशा सूचना त्यांनी यावेळी पालिका प्रशासनाला केल्या. जनतेने निवडून दिलेल्या नगरसेवकांच्या जनहिताच्या कामांकडे कर्मचाऱ्यांनी दुर्लक्ष करता कामा नये. स्वच्छता, विद्युत व पाणी पुरवठ्याच्या संदर्भात कसलाही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही असे कडक निर्देश त्यांनी दिले आहेत. यावेळी उपस्थित नगरसेवकांनी आपल्या सूचना, प्रश्न या बैठकीत मांडले.

या बैठकीला ज्येष्ठ नगरसेवक सादेक अली, अशफाक इनामदार, जैतुल्ला खान, महेश धांडे, सय्यद इलियास, रंजित बनसोडे, जकी सौदागर, प्रमोद शिंदे, शेख बिलाल, शेख खय्युम, भैय्यासाहेब मोरे, शाहेदभाई पटेल यांच्यासह पाणी पुरवठा अभियंता प्रमोद माने, विद्युत अभियंता उदय इपिल्ली, विजय गाडेकर, स्वच्छता विभाग प्रमुख गणेश पगारे, स्वच्छता निरीक्षक भागवत जाधव, भारत चांदणे, शशिकांत जोगदंड यांच्यासह कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

घंटागाडी, ट्रॅक्टर व जेसीबींना जीपीएस, नगरसेवकांकडे बॅकअप

बीड शहरात २५ प्रभाग आहेत, या प्रभागात सध्या ३५ घंटागाड्या कार्यरत आहेत, परंतु तरीही शहरातील कचरा उचलल्या जात नाही यामुळे घंटागाडी स्वच्छतेचे ढिगारे उचलणारे ट्रॅक्टर, जेसीबी यांना जीपीएस सिस्टीम बसवून त्याचे बॅकअप संबंधित प्रभागात असलेल्या नगरसेवकांकडे दिले जाणार आहे, त्यामुळे त्यांच्या प्रभागात संबंधित घंटागाडी किंवा जेसीबी, ट्रॅक्टर आला की नाही हे समजेल. प्रभागात स्वच्छता विभागाचे कामगार येण्या अगोदर त्याची पूर्व कल्पना नगरसेवकांना व संबंधित नागरीकांना पालिकेकडून दिली जाणार आहेत.

### जिल्ह्याचा अभिमान वाढेल

स्वरूपात प्रतिक्षा तंबूड,अंजली चव्हाण,सोनाली नाईकवाडे यांनी आपल्या शाळेतील आठवणी सांगितल्या तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्या एपीआय श्रीम.वर्षा व्हगाडे, उपप्राचार्य मस्के सर,श्रीमंत मुंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

श्री.मधुकररावजी धस गुरुजी व त्यांच्या सौभाग्यवती जिजाबाई धस हे धस दांपत्ये कतार देशाचा परदेश दौरा करून आल्याबद्दल कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार केशवराव आंधळे यांनी शाल,बुके देऊन सत्कार केला. त्यानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा.आ केशवराव आंधळे म्हणाले की,जिद्द,मेहनत,चिकाटीने अडचणीवर मात करून यश संपादन करता येते तुम्ही खूप अभ्यास करा बोर्ड परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन करून स्वतःच शाळेचे नाव रोशन करा असे बोलून इ. १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रगती फासे,अंकिता लोकरे यांनी केले व उपस्थितांचे आभार प्रा.अंडील जी.पी.यांनी मानले.

## भारताच्या शिक्षण व्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न

किल्ले धारूर । प्रतिनिधी

राजमाता जिजाऊ महाविद्यालयात वन डे नॅशनल वर्कशॉप ऑन आर्टिफिशियल इंटेलिजन्स इन इंडिया एज्युकेशन या विषयावर गणित विभाग व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. कार्यशाळेचे उद्घाटक डॉ. टी. जी. ठाणगे यांनी संवाद साधताना सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व वाढत आहे. याची प्रगती विविध क्षेत्रात होत आहे. यासंबंधी सविस्तर माहिती देताना ई-लर्निंग, स्मार्ट क्लासरूम, डिजिटल मूल्यमापन, वैयक्तिकीकृत शिक्षण आणि संशोधनात एआयचा वापर यावर सविस्तर विवेचन केले. अध्यक्षीय समारोपातून डॉ. राम शिनगारे यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, भविष्यातील शिक्षण



व्यवस्था अधिक तंत्रज्ञानाधारित असेल, त्यामुळे विद्यार्थ्यांनी एआयशी सुसंगत कौशल्ये विकसित करणे गरजेचे आहे असे सांगितले. प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी मार्गदर्शन करताना सांगीतले की, शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर, संधी आणि आव्हाने यावर चर्चा घडवून आणणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. याप्रसंगी विचारमंचावर डॉ. अनुराग श्रीवास्तव, डॉ. बालाजी कांबळे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेत दिवसभर विविध सत्रांच्या माध्यमातून या विषयावर सविस्तर व सखोल चर्चा झाली तसेच तज्ज्ञ मार्गदर्शकांनी तांत्रिक सत्रांद्वारे एआयच्या शैक्षणिक वापराबाबत प्रत्यक्ष उदाहरणांसह मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयांतून आलेले प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होते. उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. याप्रसंगी विचारमंचावर डॉ. बालाजी कांबळे, डॉ. अनुराग श्रीवास्तव, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल.बी. जाधवर यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयांतून आलेले प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य मेजर डॉ. मिलींद गायकवाड यांनी केले तर आभार डॉ. अनंथा गाडे यांनी मानले.

## उमरीत शिवजन्मोत्सव निमित्ताने भव्य कार्यक्रमाचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील उमरी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवजन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले असून गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने हा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.



या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह, भव्य बैलगाडा शर्यत, तसेच पालखी सोहळा अशा विविध कार्यक्रमांची आखणी करण्यात आली आहे. अखंड हरिनाम सप्ताहामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून भाविक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. गावातील उमरेश्वर मंदिर परिसरात कीर्तन, भजन, यांसारख्या धार्मिक कार्यक्रमांचा अखंड हरिनाम सप्ताह आयोजनही करण्यात येणार आहे.

तसेच ग्रामीण भागातील आकर्षण असलेली भव्य बैलगाडा शर्यत हा या उत्सवाचा मुख्य आकर्षण ठरणार आहे. शर्यतीसाठी परिसरातील तसेच इतर मराठवाड्यातील बैलगाडा मालक व शौकिन मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती समितीने दिली आहे. विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसांचीही घोषणा करण्यात आली असून शर्यतीमुळे उमरी परिसरात मोठी गर्दी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

याशिवाय पारंपरिक वेशभूषेत निघणारा पालखी सोहळा गावातील प्रमुख रस्त्यांवरून काढण्यात येणार असून ढोल-ताशांच्या गजरात आणि जयघोषात हा सोहळा पार पडणार आहे. ग्रामस्थ, युवक मंडळे व महिला भगिनींचा उत्स्फूर्त सहभाग या कार्यक्रमात अपेक्षित आहे. शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने सर्व नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहून उत्सवाची शोभा वाढवावी तसेच बैलगाडा प्रेमींनी शर्यतीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या निमित्ताने उमरी गावात धार्मिक, सांस्कृतिक आणि पारंपरिक वारशाचा संगम पाहायला मिळणार असून उत्सवाची सर्वत्र जोरदार तयारी सुरू आहे.

कार्यक्रमाची रूपरेषा

दि.९ ते १६ फेब्रुवारी अखंड हरिनाम सप्ताह,१७ फेब्रुवारी रोजी भव्य बैलगाडा शर्यत,१८ फेब्रुवारी रोजी भव्य शिवचरित्र व्याख्यान, १९ फेब्रुवारी रोजी ढोल ताशाच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पालखी सोहळा व स्नेहभोजन असी कार्यक्रमाची रूपरेषा आसेल.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद व्हिजन ऑफ इंडिया २०४७ रोल ऑफ मानव्यविद्या, सायन्स अँड कॉमर्सचे भव्य उद्घाटन

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

राजमाता जिजाऊ महाविद्यालयात आयोजित व्हिजन ऑफ इंडिया २०४७ रोल ऑफ मानव्यविद्या, सायन्स अँड कॉमर्स या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन डॉ. बालाजी कांबळे हे होते, तर अध्यक्षस्थानी डॉ. राम शिनगारे हे उपस्थिती होती. परिषदेचे बीजभाषण प्रसिद्ध विचारवंत व मार्गदर्शक डॉ. अनुराग श्रीवास्तव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या बीजभाषणातून त्यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनविण्यात कला, विज्ञान आणि वाणिज्य क्षेत्राची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. त्यांनी तंत्रज्ञान, नवकल्पना, संशोधन, उद्योजकता आणि कौशल्य विकास यावर भर देण्याचे आवाहन केले. तसेच त्यांनी बदलत्या जागतिक परिस्थितीत विद्यार्थ्यांनी स्वतःला सक्षम बनवण्याची गरज व्यक्त केली.

उद्घाटक डॉ. बालाजी कांबळे यांनी आपल्या भाषणात शिक्षण, संशोधन आणि उद्योग यांचा समन्वय साधण्याचे महत्त्व सांगितले. अध्यक्षीय समारोपतून डॉ. राम शिनगारे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश दिला. प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी महाविद्यालयामध्ये संपन्न होत



असलेल्या परिषदेमध्ये सहभागी झालेल्या सर्व मान्यवरांचे शब्दसुमनाने स्वागत केले. महाविद्यालय आयोजित करत असलेल्या विविध उपक्रम व महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा सांगितला. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून करण्यात आली. यावेळी प्राप्त झालेल्या शोधनिबंधांमधून प्रथम तीन क्रमांक मिळाविलेल्या संशोधकांना प्रमाणपत्र व पारितोषिक देण्यात आले. महाविद्यालयामध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. मानव्यवरांचा परिचय परिषदेचे संचालक डॉ. इंद्रजीत भगत, आयोजक डॉ. बालाजी नवले यांनी करून दिला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते संशोधकांकडून प्राप्त झालेल्या शोधनिबंधांच्या जर्नलच्या मुखपृष्ठाचे प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविकातून परिषदेचे सचिव डॉ. एल.बी. जाधवर यांनी कला, विज्ञान आणि वाणिज्य क्षेत्रातील भविष्यातील आव्हाने, संधी आणि भारताच्या विकासातील भूमिका व चर्चा घडवून आणणे सांगितले. याप्रसंगी विचार मंचावर डॉ. टी. जी. ठानगे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, प्राचार्य डॉ. डी. एन. गंजेवार, डॉ. अशोक लाखे, डॉ. बालाजी नवले, डॉ. विजयकुमार कुंभारे यांची उपस्थिती होती. उद्घाटन समारंभासाठी प्राध्यापक, विद्यार्थी, संशोधक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी केले, तर आभार डॉ. अनंथा गाडे यांनी मानले.



**माजलगाव:- येथील शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांची झालेली बदली रद्द होऊन माजलगाव शहर पोलीस ठाण्याचा पुन्हा पदभार स्वीकारल्याबद्दल सत्कार करुन शुभेच्छा देताना दै.राज्य लोकतंत्रचे माजलगाव प्रतिनिधी ज्योतीराम पांढरपोटे, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.अदिल सौदागर, मेडीकल असोसिएशनचे प्रदिप कर्डिले.**

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
रविवार दि.८ फेब्रुवारी २०२६
४

# देशाला फलोत्पादनाची राजधानी बनवू शकणाऱ्या मयंक गांधींच्या सूचना केंद्र शासनासमोर ठेवणार

## नीती आयोगाचे सदस्य डॉ.रमेश चंद यांची ग्वाही; दोन दिवसीय कृषीकुल दौरा

परळी । प्रतिनिधी

आपल्या देशाला महासत्ता करायचे असेल तर देशाचे शेतकरी आर्थिक सक्षम व्हावे लागतील. कृषिप्रधान आपल्या देशातील एकूण क्षेत्रापैकी केवळ १५% एवढीच फळबाग लागवड केली जाते. उत्तम दर्जाचे फळे देशातून निर्यात झाली पाहिजेत, शेतकऱ्यांना फळबाग लागवडीतून भरघोस आर्थिक उत्पन्न झाले पाहिजे. हा देश फळबाग लागवडीची राजधानी व्हावा हे जलनायक मयंक गांधी यांचे स्वप्न आहे. ते त्यांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने ग्लोबल विकास ट्रस्टचे चालेले कामकाज अतिशय उत्तम दर्जाचे आहे.  चे हे मॉडेल देशासाठी उपयुक्त असून, देशाला फलोत्पादनाची राजधानी करण्याच्या दृष्टीने सर्व उपाययोजना केंद्र शासनाच्या नियोजनात ठेऊ असे आश्वासन देशाच्या नीती आयोगाचे सदस्य डॉ.रमेश चंद यांनी दिले. ते कृषीकुल येथील महत्त्वपूर्ण नियोजन बैठकीत बोलत होते.

देशाच्या नीती आयोगाचे सदस्य डॉ.रमेश चंद हे दोन दिवसीय परळी वैजनाथ दौऱ्यावर आहेत. ग्लोबल विकास ट्रस्टच्या कृषीकुल या आंतरराष्ट्रीय शेतकरी प्रशिक्षण केंद्र येथे फलोत्पादक शेतकरी, त्यांच्यासमोरील आव्हाने आणि त्यावरील उपाययोजना यासंदर्भात अतिशय महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीस नीती आयोगाचे सदस्य डॉ.रमेश चंद, ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक



मयंक गांधी, ट्रस्टी संजय परमार, डॉ.हरिश्चंद्र वगे, माजी निवृत्त सनदी अधिकारी सुधी मोहंती, विवेक भारती, एकल फाउंडेशनचे दिवाकर झरबडे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. या अतिशय महत्त्वपूर्ण बैठकीत केंद्र शासनाच्या धोरणातील शेतकऱ्यांविषयीच्या विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. मराठवाडा हा सर्वाधिक दुष्काळी भाग आहे. कापूस आणि सोयाबीन ही पारंपरिक पिकांना फाटा देत आता मोठ्या प्रमाणावर शेतकरी फळबाग लागवड करत आहेत. ग्लोबल विकास ट्रस्टकडून शेतकऱ्यांना प्रशिक्षण, अल्प दरात लागवडीसाठी रोपे आणि काढणी नंतर बाजारपेठेची उपलब्धतात याविषयी मार्गदर्शन करण्यात येत आहे. हे सर्व प्रयत्न वैश्विक पातळीवर करण्याजोगे आहेत.  चे मॉडेल देशभर राबवता येण्यासारखे असल्याचे मत केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मागील शेतकरी संवाद मेळाव्यात हजारो शेतकऱ्यांच्या साक्षीने केले होते. देशाला जागतिक पातळीवर फलोत्पादनाची राजधानी बनवण्याचा जलनायक मयंक गांधी यांचा संकल्प आहे. त्यासाठीचे देशाचे धोरण अनुकूल असणे आवश्यक असल्याने आजच्या बैठकीत महत्त्वाची चर्चा घडून आली. या बैठकीत श्री.मयंक गांधी यांनी केलेल्या सूचना लक्षात घेऊन सर्व बाबींना मी केंद्र शासनासमोर ठेवेन अशी ग्वाही निती आयोगाचे सदस्य डॉ.रमेश चंद यांनी दिली. बैठकीनंतर परळी आणि अंबाजोगाई तालुक्यातील विविध गावांतून आलेल्या शेतकऱ्यांशी डॉ.रमेश चंद यांनी संवाद साधला. यावेळी नव्याने फळबाग लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने आणि  बँकेच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. २५ शेतकऱ्यांना या कार्यक्रमात मदतीच्या धनादेशाचे वितरण करण्यात आले. केळी आणि तुती लागवड करणाऱ्या जवळपास २ हजार शेतकऱ्यांना मदत करण्याचे प्रमुख उद्दिष्ट ग्लोबल विकास ट्रस्टने डोळ्यासमोर ठेवले आहे.

**आज सामुदायिक विवाह सोहळा**

ग्लोबल विकास ट्रस्ट आणि दानशूर व्यक्तिमत्व राजेश मेहता यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षी ११ जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे. आज शनिवार, दिनांक ०७ फेब्रुवारी रोजी सिरसाळा येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होत आहे. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंब, अंध आणि अपंग पालक असलेल्यांची मुले तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या कुटुंबातील जोडप्यांची या सोहळ्यात निवड करण्यात आली आहे.

## अंगोरा प्रजातीची शेळी पाळा; दूध, मांस उत्पादनासह लोकरीतून होईल भरभराट!

राज्यासह देशभरात शेळीपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणात विस्ताराला आहे. प्रामुख्याने आपल्याकडे शेळीपालन व्यवसाय हा दुग्ध उत्पादन, मांस उत्पादन असे दोन प्रमुख उद्देश ठेऊन केला जातो. मात्र, जगभरात अशाही काही शेळ्यांच्या जाती आहेत, ज्या या दोन्ही उद्देश सध्या करण्यासोबतच लोकरच्या माध्यमातून विणकाम उद्योगासाठी देखील महत्वपूर्ण मानल्या जातात. आज आपण अशाच शेळीच्या जातीबद्दल जाणून घेणार आहोत. जिच्या शरीरावरील केसांना लोकर विणकाम उद्योगामध्ये अनन्यसाधारण महत्व आहे.

हे आहे मूळस्थान : शेळीची अंगोरा किंवा अंकारा शेळीची तुर्किश जात आहे. तिचे मूळस्थान तुर्कस्तान असून, ही शेळीची जात दिसण्याबाबत काहीशी मेंढीशी साध्यर्म साधते. या शेळीच्या केसांपासून 'मोहेर' म्हणून ओळखले जाणारे चमकदार फायबर तयार करते. थोडक्यात मोहेर म्हणजे शेळीच्या केसांपासून तयार होणारे रेशम होय. जे कापड निर्मिती आणि गरम कपड्यांची निर्मितीसाठी खूप प्रभावी मानले जाते. भारतात प्रामुख्याने जम्मू आणि काश्मीर या राज्यामध्ये या प्रजातीच्या शेळ्या आढळून येतात.

तीनही मार्गाने आर्थिक फायदा : अंगोरा प्रजातीची शेळीचे आयुर्मान हे जवळपास १० वर्षांपेक्षा जास्त असते. इतर शेळ्यांच्या तुलनेत या प्रजातीची शेळी ही प्रजननक्षम नसते. अर्थात ही शेळी सर्वसाधारणपणे प्रत्येक वेळी एकाच करडाला जन्म देण्यास सक्षम असते. अर्थात



मांस उत्पादनासाठी त्यामुळे फटका बसतो. मात्र, अंगोरा प्रजातीची केस हे साधारणपणे मेंढीप्रमाणे वर्षातून दोनदा कातरले जातात. यात एकदा प्रामुख्याने वसंत ऋतूमध्ये तर दुसर्यांदा शरद ऋतूमध्ये लोकर मिळते. अर्थात दुधासह मांस उत्पादन आणि लोकर उत्पादनामुळे या शेळीचे पालन करणे शेतकऱ्यांना आर्थिक समृद्धी मिळवून देणारे ठरते. 'या' शेळीची वैशिष्ट्ये : अंगोरा सामान्यतः इतर पाळीव शेळ्या आणि मेंढ्यांपेक्षा आकाराने लहान असते. या शेळीची दोन्ही शिंगे डोक्यावर वळलेली असतात. तर कान लांब आणि झुकलेले आहेत. तर या प्रजातीच्या शरीरावरील केस हे मजबूत, लवचिक फायबरसारखे असतात. मुख्यतः त्याच्या गुळगुळीतपणा आणि चमकदारपणामुळे ते इतर शेळ्या मेंढ्यापेक्षा महागडे आणि वेगळे ठरते.

## भारत-अमेरिका व्यापार करार महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी घातक; विजय वडेट्टीवारांचा आरोप

यवतमाळ / प्रतिनिधी

भारत आणि अमेरिका यांच्यात झालेल्या व्यापार करारावरुन काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केंद्र सरकारवर टीका केली. शनिवारी (दि. ७) यवतमाळ येथे पत्रकारांशी बोलताना त्यांनी करारातील त्रुटी आणि कृषी क्षेत्रावर होणारे परिणाम अधोरेखित केले. तसेच, हा करार महाराष्ट्रासह देशातील शेतकऱ्यांसाठी घातक ठरेल आणि स्थानिक बाजारपेठेला फटका बसेल, असे ते म्हणाले.



विजय वडेट्टीवार यांनी आयात-निर्यात शुल्कातील असमतोल अधोरेखित करत सांगितले की, भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या मालावर १८ टक्के शुल्क आकारले जाणार आहे. मात्र अमेरिकेतून भारतात येणाऱ्या कृषी उत्पादनांवर शून्य टक्के आयात शुल्क असेल. तसेच, "एका बाजूला भारतीय मालावर कर लावायचा आणि दुसऱ्या बाजूला अमेरिकन मालासाठी भारताची दारे विनाशुल्क उघडायची, हा कसला न्याय?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या अटींमुळे भारतीय शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करणे कठीण होईल, असेही ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की, नवीन पिके कापणीला येत असतानाच हा करार लागू होणे दुर्दैवी असल्याचे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले. अमेरिकेतून स्वस्त कृषी माल भारतात आल्यास भारतीय सोयाबीन, गहू, कापूस आणि मका उत्पादकांना आपली उत्पादने विकणे कठीण होईल, असा त्यांनी  दावा केला आहे. त्याचबरोबर कापसाचे आगार मानल्या जाणाऱ्या विदर्भातील शेतकऱ्यांचे आर्थिक गणित त्यामुळे कोलमडेल, असेही त्यांनी नमूद केले. केंद्र सरकारने हा करार बाह्य दबावाखाली केल्याचा आरोप करत, त्याचे परिणाम सरकारला आगामी काळात भोगावे लागतील, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, शेतकरी प्रश्नांवर बोलताना वडेट्टीवार यांनी आकडेवारी देत सरकारवर जोरदार टीका केली. जानेवारी महिन्यात एकट्या यवतमाळ जिल्ह्यात कर्जबाजारीपणामुळे २२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा दावा त्यांनी केला. तसेच, "निवडणुकीपूर्वी कर्जमाफीचे मोठे गाजर दाखवले, पण सत्ता मिळताच सरकारला शेतकऱ्यांचा विसर पडला," अशी बोचरी टीका त्यांनी यावेळी केली. तसेच, एकाही शेतकऱ्याला ठोस कर्जमाफी मिळालेली नाही, हे सरकारचे मोठे अपयश असल्याचेही त्यांनी सांगितले. त्याचबरोबर वडेट्टीवार यांनी नव्या व्हीबी-जी राम जी कायद्यावर आक्षेप घेतला. पूर्वीच्या मनरेगा योजनेमुळे ग्रामीण भागात १०० दिवसांच्या कामाची व मजुरीची हमी मिळत होती, असे त्यांनी सांगितले. मात्र नव्या कायद्यामुळे ही हमी धोक्यात आली असून मजुरांच्या हाताला काम मिळणे कठीण झाले आहे. सरकार ग्रामीण अर्थव्यवस्थेला खिळ घालण्याचे काम करत आहे, असाही आरोप त्यांनी केला.

## ढगाळ वातावरणात द्राक्षावरील भुरी नियंत्रण

सध्या तापमानामध्ये वाढ होत असल्याने मण्यांची वाढ वेगाने होत आहे. त्यामुळे घड कॉम्पॅक्ट होण्यास सुरुवात झाली आहे. काही बागांमध्ये घडाच्या आतील भागात भुरी वाढत असलेली दिसत आहे. त्याकडे त्वरित लक्ष देणे गरजेचे आहे. कारण भुरीचा प्रादुर्भाव वेगाने वाढल्यास संपूर्ण घड खराब होण्याची तसेच बागेत भुरीचा प्रसार वेगाने होण्याची शक्यता निर्माण होते. विशेषतः भुरी जर देठावर हळूहळू वाढत राहिली तर मण्यात साखर भरण्याच्या प्रक्रियेत अडथळा येतो.

भुरी नियंत्रणासाठी उपाय : सद्यःस्थितीमध्ये भुरीच्या नियंत्रणासाठी आंतरप्रवाही बुरशीनाशकांची फवारणी शक्य नाही. आंतरप्रवाही बुरशीनाशके फवारल्यास त्या बुरशीनाशकांचे उर्वरित अंश काढणीपर्यंत निश्चितच राहणार. शेवटच्या काही दिवसांपर्यंत सल्फरची फवारणी करणे शक्य आहे. मात्र ही फवारणी करताना मण्यांवर डाग पडणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे.  किंवा फॉर्म्यूलेशन व सूक्ष्म तुषारने फवारणी करणारे यंत्र वापरल्यास मण्यांवर सल्फरचे डाग येणार नाहीत.मिक्रोनाइज्ड सल्फर भुकटी उपलब्ध असल्यास काही बागायतदार या भुकटीची बोदावर धुरळणी करतात. त्यातून निर्माण होणारा २ वायू बागेतील भुरी रोग नियंत्रणात ठेवण्यास मदत करतो. ही पद्धत प्रात्यक्षिक स्वरूपात मर्यादित क्षेत्रात प्रयोग म्हणून करता येईल. अलीकडे नॅनो सिल्व्हरची फॉर्म्यूलेशन्सदेखील उपलब्ध होत आहेत.




सिल्व्हरचे अति सूक्ष्म कण भुरी रोगाच्या नियंत्रणात उपयुक्त ठरत असल्याने, अशा फॉर्म्यूलेशन्स उपलब्ध करून देणाऱ्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचा वापर करणे शक्य आहे. भुरी नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा, ॲम्पिलोमायसेस इत्यादींचा फवारणीद्वारे वापर केल्यास त्या झाडांवर या मित्रबुरशींची वाढ होऊन तेथून त्यांचे बीजाणू हवेद्वारे जवळील बागेत पसरू शकतात. या माध्यमातून बागेतील भुरीवर नियंत्रण मिळण्यास मदत होते. बागेच्या बाहेरील झाडांवर पोषक वातावरणात भुरी वेगाने वाढते. या झाडांवर बुरशीनाशकांची फवारणी झालेली नसल्यामुळे त्यावर जैविक नियंत्रणासाठी वापरलेल्या बुरशींची वाढ वेगाने होते. अशा भुरीवर वाढलेल्या बुरशीची जैविक नियंत्रणाची क्षमता ही प्रयोगशाळेमध्ये मीडियावर वाढवलेल्या जैविक नियंत्रणाच्या बुरशीपेक्षा कित्येक पटीने जास्त असते. अशा झाडांवर वाढविलेल्या जैविक नियंत्रणाच्या बुरशी बरेच दिवस किंवा हंगामात जिवंत राहून अप्रत्यक्षपणे भुरीचे नियंत्रण करत राहतात.

काही अतिरिक्त निरीक्षणे : या वर्षी थंडीचा प्रभाव असल्याने बहुतांश बागांमध्ये पाने तुलनेने छोटी राहिल्याचे दिसून येते. वाढीच्या सर्व अवस्था साधारण ८ ते १० दिवस उशिरा दिसल्या. मात्र मण्यांमध्ये मऊपणा अपेक्षेपेक्षा लवकर, म्हणजे छाटणीनंतर सुमारे ८० दिवसांत सुरू झाला आहे. त्यामुळे मण्यांची फुगवण आणि साखरेची वाढ अपेक्षेप्रमाणे होईल की नाही, याबाबत काहीशी शंका निर्माण झाली आहे.  ज्या बागेत काढणीसाठी अजूनही ३५ ते ४० दिवसांपेक्षा जास्त वेळ आहे, अशा बागेत साखरेची वाढ अपेक्षित मिळविण्यासाठी मण्यांची हलकी थिनिंग केल्यास फायदा होईल असे वाटते. विशेषतः बेदाण्यासाठी टीएसएस हा २२ पेक्षा जास्त लागतो. सध्याच्या परिस्थितीत टीएसएस २२ होण्यास जास्त वेळ लागणार आहे. मार्च, एप्रिल महिन्यात पावसाळी वातावरण तयार होऊन बेदाणे सुकविण्याच्या काळाच आर्द्रता वाढल्यास बेदाण्याचा दर्जा खालविण्याची शक्यता आहे. सध्या सकाळच्या व रात्रीच्या तापमानातील फरक जास्त आहे. हा तापमानातील फरक रंगीत द्राक्ष जातींमध्ये चांगला रंग विकसित होण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरतो. त्यामुळे तुलनेने उशिरा छाटलेल्या रंगीत जातींच्या बागांमध्ये चांगला रंग येण्यासाठी वेगवेगळ्या संजीवकांचा वापर सध्या फारसा आवश्यक वाटत नाही. या टप्प्यावर संजीवकांचा वापर टाळल्यास किंवा कमी केल्यास द्राक्षांमधील साखर अधिक लवकर वाढण्यास मदत होईल. काही रंगीत जातींमध्ये घड लांबट स्वरूपाचे असतात. अशा बागांमध्ये सध्या थिनिंग करण्याऐवजी, लांब घडाच्या खालच्या बाजूचे ४ ते ६ मणी काढून टाकल्यास उरलेल्या मण्यांमध्ये साखर भरण्याची प्रक्रिया वेगाने होते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७१४ : छत्रपती शाहू महाराज (सातारा गादी) आणि सरखेल कान्होजी आंग्रे यांच्यात वळवंड (लोणावळा) येथे तह झाला.
१८४९ : रोमन प्रजासत्ताकची रचना करण्यात आली.
१८९९ : रँडचा खून करण्यार्या चाफेकर बंधूंची नावे इंग्रज सरकारला सांगणार्या गणेश शंकर द्रविड व रामचंद्र शंकर द्रविड या बंधूंचा वासुदेव चाफेकर आणि महादेव रानडे यांनी गोळ्या झाडून वध केला.
१९३१ : महादेव विठ्ठल काळे यांनी 'आत्मोद्धार' नावाचे पाक्षिक सुरू केले.
१९३६ : १६ सप्टेंबर १९३५ रोजी नोंदणी झालेल्या 'बँक ऑफ महाराष्ट्र'चे कामकाज सुरू झाले.
१९४२ : दुसरे महायुद्ध  जपानने सिंगापूर ताब्यात घेतले.
१९४३ : आजच्या दिवशी नेताजी सुभाष चंद्र बोस जर्मनी मधून एका नावेच्या माध्यमाने जपान साठी निघाले.
१९६० : पंजाबच्या खडकसिंह या मल्लाविरुद्ध गुणांवर विजय मिळवून गणपत आंदळकर 'हिंदकेसरी' बनले.
१९७१ : हा अमेरिकन शेअर बाजाराचा निर्देशांक सुरू झाला.
१९८६ : आजच्या दिवशी दिल्लीच्या विमानतळावर प्रीपेड टॅक्सी ची सुरुवात.
१९९४ : भारतीय गोलंदाज कपिलदेव निखंज यांनी ४३२ बळींचा जागतिक विक्रम केला.
१९९९ : आजच्या दिवशी अंतराळातून स्टारडस्ट नावाचे अंतरीक्ष यान रवाना झाले.
२००० : छत्रपती शिवाजी महाराज जयंती १९ फेब्रुवारीस करण्याचा महाराष्ट्र शासनाचा निर्णय.
२००८ : ओडीसा च्या शशुपालगढ येथे २५०० वर्षापूर्वीचे शहर उत्खनन करते वेळी सापडले.
२०१५ : नीती आयोगाची पहिली बैठक.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६७७ : जॅक्स कॅसिनी - फ्रेन्च खगोलशास्त्रज्ञ (मृत्यू: १६ एप्रिल १७५६)
१७०० : डॅनियल बर्नोली - डच गणितज्ञ (मृत्यू: १७ मार्च १७८२)
१८२८ : ज्यूल्स वर्न - फ्रेन्च लेखक (मृत्यू: २४ मार्च १९०५)
१८३४ : दिमित्री मेंदेलिएव्ह - रशियन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २ फेब्रुवारी १९०७)
१८४४ : गोविंद शंकरशास्त्री बापट - भाषांतरकार
१८८१ : सिविल सर्विसेस मध्ये असलेले वी.टी. कृष्णमाचारी यांचा जन्म.
१८९७ : डॉ. झाकिर हुसेन - भारताचे ३ रे राष्ट्रपती, शिक्षणतज्ञ. पद्मविभूषण व भारतरत्न हे सन्मान त्यांना देण्यात आलो होते. 'जमिया मिलिया इस्लामिया' या शिक्षण संस्थेचे संपादक पुढे ही संस्था विद्यापीठात रुपांतरित झाली. (मृत्यू: ३ मे १९६९)
१९०९ : प्रा. केशव विष्णू तथा 'बाबा' बेलसरे  - तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक, श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचे शिष्य (३ जानेवारी १९९८)
१९२५ : शोभा गुर्टू - शास्त्रीय गायिका (मृत्यू: २७ सप्टेंबर २००४)
१९४१ : जगजीतसिंग - गझलगायक (मृत्यू: १० आक्टोबर २०११)
१९५१ : हिंदी भाषेचे प्रसिद्ध लेखक अशोक चक्रधर यांचा जन्म.
१९६३ : मोहम्मद अजहरुद्दीन - भारतीय क्रिकेटपटू
१९८० : भारतीय चित्रपट अभिनेते जयदीप अहलावत यांचा जन्म.
१९८६ : भारतीय महिला क्रिकेटर एकता बिष्ट यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७२५ : पीटर द ग्रेट (पहिला) - रशियाचा झार (जन्म: ९ जून १६७२)
१९२७ : बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर - ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रीय गायक (जन्म: ७ सप्टेंबर १८४९)
१९६५ : च्या भारत - पाक युद्धकाळात ते नौदलप्रमुख होते. (जन्म: मार्च १९१३)
१९७१ : डॉ. कन्हैय्यालाल मुन्शी - मुंबईचे पहिले गृहमंत्री, हैदराबाद संस्थानात भारत सरकारचे एंजट जनरल, नामवंत साहित्यिक आणि 'भारतीय विद्याभवन'चे संस्थापक (जन्म: ३० डिसेंबर १८८७)
१९७५ : रॉबर्ट रॉबिनसन - वनस्पतिज रंग व अल्कलॉईड्सवर संशोधन करणारे ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: १३ सप्टेंबर १८८६)
१९९४ : यशवंत नरसिंह केळकर - कवी, कोशकार, इतिहास संशोधक, इतिहास लेखक, शाहिरी वाङ्मयाचे संग्राहक, संपादक व प्रकाशक (जन्म: १९ जुलै १९०२)
१९९४ : गोपाळराव देऊसकर - ख्यातनाम चित्रकार (जन्म: १९११)
१९९५ : भास्करराव सोमण - भारताचे माजी नौदलप्रमुख, व्हाईस ॲडमिरल.
१९९५ : भारतीय स्वातंत्र्य सैनिक कल्पना दत्त यांचे निधन.
१९९५ : राजस्थान चे माजी मुख्यमंत्री टीका राम पलीवाल यांचे निधन.
१९९९ : डॉ. इंदुताई पटवर्धन - आनंदग्रामच्या संस्थापिका व थोर समाजसेविका (जन्म: १४ मे १९२६)
२००६ : भारतीय मॉडेल कुलजित रंधवा यांचे निधन.

cmyk

रविवार दि.८ फेब्रुवारी २०२६ ५

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# वाळू माफियांचा धुमाकूळ; महिला तलाठ्यावर ट्रॅक्टर घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या १३ जणांवर गुन्हे

अंबड। प्रतिनिधी

८ ते १० दिवस मेडिकल रजेवर असलेले तहसीलदार परत हजर होऊन वाळू माफ यावर धडाकेबाज कारवाई सुरू केल्या यामुळे वाळू माफिया यांच्या झोपा उडाल्या. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार विजय चव्हाण यांचा 'ॲक्शन प्लॅन'; वाळू चोरांवर आता 'एमपीडीए' आणि 'मोक्का'ची कारवाई करण्यात येणार आहे. ६ फेब्रुवारी रोजी अंबड तालुक्यातील सुकना नदीपात्रात आवा/अंतरवाला परिसर) रात्रीच्या अंधारात अवैध वाळू उपसा करणाऱ्या आणि कारवाईसाठी गेलेल्या महिला तलाठ्याच्या अंगावर ट्रॅक्टर घालून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या वाळू माफियांवर प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या धडक कारवाईत १३ जणांवर यात ५ खबऱ्यांचा समावेश) गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व नेतृत्व ही धडक कारवाई जिल्हाधिकारी अशीमा मित्तल मॅडम यांच्या आदेशान्वये, तसेच अपर जिल्हाधिकारी श्री. रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शशिकांत हदगल आणि उपविभागीय दंडाधिकारी श्री. उमाकांत पारदी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या संपूर्ण कारवाईचे नियोजन आणि प्रत्यक्ष नेतृत्व अंबडचे तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी श्री. विजय चव्हाण यांनी केले.

नेमकी घटना आणि पार्श्वभूमी: गेल्या काही दिवसांपासून अंबड तालुक्यातील सुकना नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत्या. यापूर्वी अनेकदा महसूल पथकाने कारवाईचा प्रयत्न केला, परंतु वाळू माफियांचे 'खबरी' अधिकाऱ्यांच्या हालचालींवर पाळत ठेवून (रेकी करून) वाळू चोरांना सतर्क करत असत, ज्यामुळे कारवाई निष्फळ ठरत होती. मात्र, यावेळी तहसीलदार विजय चव्हाण यांनी अत्यंत गोपनीय पद्धतीने सापळा रचला. या दरम्यान, सजा आलमगावच्या महिला तलाठी मीरा सखाराम कोल्हे व त्यांचे पथक कारवाईसाठी गेले असता, मुजोर वाळू माफियांनी त्यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने त्या बचावल्या. या गंभीर प्रकारानंतर प्रशासनाने कठोर पवित्रा घेत भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये गुन्हे दाखल केले आहेत.

यांच्यावर झाले गुन्हे दाखल (एकूण १३ आरोपी) अंबड पोलीस ठाण्यात दाखल एफ.आय.आर. (क्र. ००६४/२०२६) नुसार खालील लोकांवर कारवाई करण्यात आली आहे वाळू चोरी करणारे (ट्रॅक्टर मालक/चालक): कल्याण भाऊराव खडके, दत्ता पांडुरंग साकळकर, जमील जिलानी शेख, गणेश रामप्रसाद दसपुते, संभाजी कारभारी भागवत, मदन रामेश्वर चोपडे, आकाश ऋषींदर शिंदे आणि पवन सुरेश शिंदे. पाळत ठेवणारे (खबरी): विकास खंडागळे, अंकुश खंडागळे, बाळासाहेब रामप्रसाद दशपुते, सचिन पांडुरंग साकळकर आणि सोहेल जिलानी शेख. सदर कारवाईत अंदाजे ४,५०,००० रुपयांची ९० ब्रास वाळू चोरी उघडकीस आली आहे). तहसीलदारांचा कडक इशारा: आता इतर ठिकाणांचा नंबर! या कारवाईबाबत बोलताना तहसीलदार श्री. विजय चव्हाण यांनी स्पष्ट केले की ''वाळू माफियांनी महिला अधिकाऱ्यावर हल्ला करून हद्द पार केली आहे. आता आम्ही केवळ गुन्हे दाखल करून थांबणार नाही. तालुक्यातील इतर ठिकाणी जिथे अवैध गौण खनिज उत्खनन सुरू आहे, त्या ठिकाणांची गोपनीय माहिती गोळा करण्याचे काम आमचे पथक करत आहे. त्या सर्वांवर लवकरच छापे टाकण्यात येतील. सराईत गुन्हेगारांवर तडीपारी, तसेच एमपीडीए आणि मोक्का अंतर्गत कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे. कुणाचीही गय केली जाणार नाही या कारवाईत तलाठी मीरा कोल्हे, मंडळ अधिकारी विलास राजपूत आणि महसूल पथकातील सर्व सदस्यांनी धाडसाने सहभाग नोंदवला. पुढील तपास पोलीस हवालदार आर. आर. हरकाळ करत आहेत.

## रासायनिक आपत्तीवरील टेबल-टॉप एक्सरसाइज आणि मॉकड्रिल



जालना । प्रतिनिधी

मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आशिमा मित्तल, यांचे निर्देशानुसार व निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शशिकांत हदगल यांचे मार्गदर्शनानुसार दिनांक ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी सहकारी साखर कारखाना'' या रासायनिक कारखान्यात राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल मार्फत जिल्हयात रासायनिक आपत्तीवरील टेबल-टॉप एक्सरसाइज आणि मॉकड्रिल आयोजीत करण्यात आली होती. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. श्री. राजेश टोपे, हे होते. कार्यक्रमाची सुरुवात विविध शासकीय अधिकारी तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलच्या पथकाच्या परिचयाने करण्यात आली. त्यानंतर पथकाद्वारे पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन सादरीकरण करण्यात आले, ज्यामध्ये संबंधित सर्व घटकांच्या भूमिका व जबाबदाऱ्या स्पष्ट करण्यात आल्या.

या मॉक ड्रिलमध्ये इथेनॉल टाकी व पाईपलाईनमधून गळती होऊन कारखाना परिसरात आग लागल्याचा काल्पनिक प्रसंग गृहीत धरून सराव करण्यात आला. यावेळी पथकाने इथेनॉलच्या मटेरीयल सेफ्टी डेटा शीट बाबत माहिती दिली तसेच प्रत्यक्ष आपत्कालीन व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक सादर केले. या मॉक ड्रिलचा उद्देश आपत्कालीन परिस्थितीत जनजागृती करणे तसेच त्रुटी विश्लेषण करणे हा होता. मॉक ड्रिल यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर पथकाने बचाव कार्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध उपकरणे व साधनांची माहिती दिली. या कार्यक्रमास औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय अंतर्गत श्री. उमाकांत पारधी, उपविभागीय अधिकारी, अंबड, श्री. विजय चव्हाण, तहसीलदार, अंबड, मुख्याधिकारी मनोज उकिर्डे ,श्री. पी. व्ही. सुरसे, सह संचालक, श्री. नंदकिशोर देशमुख, उपसंचालक, श्री.दिपक काजळकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जालना, डॉ. दयानंद कांबळे, तालुका आरोग्य अधिकारी, श्री. आकाश तळवडकर, सहाय्यक संचालक, सौ. शीतल गायकवाड, सहाय्यक संचालक यांचेसह सर्व संबंधीत विभागप्रमुख तसेच कंपनीचे सहकारी उपस्थित होते.

## मनपात नोकरशाहीचा अंमल संपला, आता जनतेच्या प्रतिनिधींचा दरबार-ज्योती गाडे

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शहराच्या महापौर पदी राष्ट्रवादीच्या ज्योती गाडेव उपमहापौर पदी भाजपचे धनंजय जाधव यांची बिनविरोध निवड झाली. निवडीनंतर दोघांनीही पदभार स्वीकारल्यावर गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेली प्रशासकीय राजवट संपुष्टात आली आहे. दरम्यान, महापौर गाडे व उपमहापौर जाधव यांनी पदभार स्वीकारताच कामाला सुरुवात करून आरोग्य विभागाच्या व आरोग्य केंद्रांच्या कामांचा आढावा घेतला.

महापौर-उपमहापौर निवडीसाठी मनपा सभागृहात विशेष सभेत पीठासीन अधिकारी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली. त्यांना सहायक म्हणून मनपा निवडणूक अधिकारी व आयुक्त यशवंत डांगे व नगर सचिव मेहेर लहारे उपस्थित होते. दाखल अर्जांच्या छाननीत महापौर पदाच्या उमेदवार ज्योती गाडे व त्यांचे सूचक गणेश भोसले आणि अनुमोदक अविनाश घुले तसेच उपमहापौरपदाचे उमेदवार धनंजय जाधव व त्यांचे सूचक बाबासाहेब वाकळे आणि अनुमोदक निखील वारे सभागृहात प्रत्यक्ष उपस्थित आहे की नाहीत व दोन्ही अर्जांवर त्यांच्या स्वाक्षरी आहेत की नाही याची खात्री त्यांनी केली. छाननीत अर्ज वैध ठरल्याचे त्यांनी घोषित केले. माघारीसाठीची १५ मिनिटांची मुदत असल्याने ती संपण्याची वाट न पाहता डॉ. आशिया यांनी दोन्ही उमेदवारांना, तुम्हाला विड्रॉल करायचे आहे का, असा सवाल केला. दोन्ही उमेदवारांनी माघारीस नकार दिल्याने व प्रतिस्पर्धी उमेदवार नसल्याने दोन्ही निवडी बिनविरोध झाल्याचे डॉ. आशिया यांनी घोषित केले. महापौर ज्योती गाडे खुर्चीत विराजमान होताच टाळ्यांचा कडकडाट झाला. मात्र, दुसरीकडे त्यांचे डोळे पाणावले. एकीकडे वडील माजी आमदार शिवाजीराव कर्डिलेंची आठवण मनात दाटून आली, तर दुसरीकडे महापौरपद म्हणजे शहराच्या प्रथम नागरिकाचा मिळालेला मान सुखावत होता. दुःख व आनंदाच्या संमिश्र भावनांमुळे त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले. वडील स्व. कर्डिले व उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या आशीर्वादाने या पदावर बसल्याचे सांगत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

## ढोरेगावमध्ये सडा-सारवण, रांगोळीने मतदारांचे स्वागत

गंगापूर । प्रतिनिधी

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, ढोरेगाव येथील मतदान केंद्र सज्ज झाले आहे. निवडणूक प्रक्रियेसाठी सर्व तयारी पूर्ण झाली आहे. मतदान पथकाच्या स्वागतासाठी शाळा परिसरात सडा, सारवण टाकण्यात आला. रंगीबेरंगी भव्य रांगोळी साकारण्यात आली. रांगोळीत लोकशाही, मतदानाचा हक्क, राष्ट्रीय प्रतीके आणि सकारात्मक संदेश प्रभावीपणे मांडले गेले. परिसर प्रसन्न आणि उत्साही वातावरणाने भारावून गेला. मतदान केंद्रात प्रवेश करताच स्वागत होत असल्याची भावना रांगोळीमधून व्यक्त होणार आहे.निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार केंद्रावर सर्व सुविधा उपलब्ध आहेत. स्वच्छता, बैठक व्यवस्था आणि सूचना फलकांची योग्य मांडणी करण्यात आली आहे. त्यामुळे हे केंद्र सौंदर्यदृष्ट्याही आदर्श ठरत आहे. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये मतदानाविषयी उत्साह निर्माण झाला आहे. शाळेतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. केंद्रप्रमुख दत्तात्रय दाणेकर, मुख्याध्यापिका अंजली पुऱ्हे, शिक्षक राजेश हिवाळे, मनोज घुले, शंकर राऊत, बसवराज उदे, दिलीप धर्माधिकारी, भाऊसाहेब गाढवे, नीलिमा कुलकर्णी, मुग्धा निमसे, मनोज मस्के, सचिन पाटसकर, शामीर शेख, अली बाकोदा, कल्याणी जगताप यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत पुढाकार घेतला.

## लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात माता रमाई जयंती उत्साहात साजरी

लिंबागणेश

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धांगिनी, त्यागमूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती आज शनिवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात माता रमाई यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी प्रास्ताविक केले, तर सुरेश निर्मळ यांनी आभारप्रदर्शन केले. यावेळी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष डॉ. गणेश ढवळे यांनी माता रमाई यांच्या जीवनकार्यावर प्रेरणादायी विचार मांडले. त्यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ''थॉट्स ऑन पाकिस्तान'' हा ग्रंथ माता रमाईंना अर्पण केला होता. बाबासाहेबांनी रमाईंच्या त्यागाबद्दल लिहिताना




म्हटले होते ''रमा, तू नसतीस तर मी भीमाचा भिमराव आणि भिमरावाचा बाबासाहेब होऊ शकलो नसतो.

डॉ. ढवळे यांनी माता रमाई यांच्या संघर्षमय जीवनाचा आढावा घेत सांगितले की, लहानपणीच आई-वडिलांचे छत्र हरपलेली रमाई, सासरीही अनेक आप्तस्वकीयांच्या मृत्यूचे दुःख सहन करत आयुष्यभर धैर्याने उभी राहिली. सासरे सुभेदार रामजी, बाबासाहेबांचे बंधू, पुतण्या, सावत्र आई तसेच स्वतःच्या मुलांच्या निधनाचे दुःख त्यांनी शांतपणे सहन केले. रमेश, गंगाधर, राजरत्न आणि इंदू या मुलांच्या वियोगाचे वेदनादायी क्षण त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले, मात्र बाबासाहेबांच्या शिक्षणकार्याला व समाजोद्धाराच्या ध्येयाला त्यांनी कधीही बाधा येऊ दिली नाही. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून त्यांनी बाबासाहेबांच्या कार्याला अखंड साथ दिली. ''माता रमाई यांचे योगदान केवळ कौटुंबिक नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अमूल्य आहे,'' असे प्रतिपादन डॉ. ढवळे यांनी केले. वयाच्या अवघ्या ३७ व्या वर्षी त्यांचे निधन झाले, मात्र त्यांच्या त्यागामुळे त्या आजही दिनदलितांची माता रमाई म्हणून स्मरणात आहेत. यावेळी माजी उपसरपंच शंकर वाणी, दादा गायकवाड, बाळकृष्ण थोरात, शिवाजी जाधव, गणपत तागड, जितेंद्र निर्मळ, सर्पमित्र अशोक जाधव, राहुल निर्मळ, सिताराम थोरात, संजय पावले, जीवन मुळे, सुखदेव वाणी, प्रमोद निर्मळ, जगन्नाथ मोरे, शाकींदर काटकर, कल्याण मांडवे आदी मान्यवर उपस्थित होते.

## चिमुकल्यांच्या विविध कलाविष्काराने ग्रामस्थ भारावले

### शेकटा जि.प.शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

बीड। प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा केंद्र अंतर्गत असलेल्या जि.प.प्रा. शाळा शेकटा या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी संपन्न झाले. यावेळी कार्यक्रमाची सुरवात दिपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्धाटन गटशिक्षणाधिकारी काळम पाटील, केंद्रप्रमुख सुधाकर सानप शालेस समिती अध्यक्ष भाऊसाहेब महानोर मुख्याध्यापक वाघ यांच्या हस्ते प्रतिमापुजनाने करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बद्रीनाथ डोंगरे,जाधव,दहिफळे, बांगर,बारगजे, मस्के, हाके,कोळेकर आदींची उपस्थिती होती.

चकलांबा केंद्राअंतर्गत येत असलेल्या जि.प.प्रा.शाळा शेकटा येथे दरवर्षी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन मोठ्या उत्सात करण्यात येते. त्याचप्रमाणे याहीवर्षी स्नेहसंमेलनाचे आयोजन दि. ६ फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते. यावेळी शेकटा येथील इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या वर्गात शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपली कलाकारी सादर केली. आपल्या पाल्याची कला पाहून पालकही आनंदी




झाल्याचे दिसून येत होते. चिमुकल्यांनी अत्यंत दुर्गभ भागात राहून देखील अत्यंत सुरेख अशी कला सादर केली. ग्रामस्थांनी आपल्या पाल्याला अत्यंत सुरेख अशी साद दिली. शाळेच्या प्रागणात अत्यंत देखण्या स्वरुपाचे स्टेज उभारण्यात आल्याने ग्रामीण भागातही अशा प्रकारे स्नेहसंमेलन होवू शकते हेच एक प्रकारे शालेय समितीने दाखवून देण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षक, शिक्षीका यांनी मोठे परिश्रम घेतले. मुख्याध्यापिका वाघ, काशिद, शिरसाट,बडे, कांबळे यांनी चिमुकल्यांना कला सादर करण्यासाठी तयार करून मोठे परिश्रम घेतले. कार्यक्रम देखना करण्यासाठी शालेय समिती अध्यक्ष भाऊसाहेब महानोर, उपाध्यक्ष राधा हाके,राजेंद्र महानोर, शहादेव शेंबडे, तुकाराम महानोर, शरद महानोर, बाबासाहेब डोईफोडे, विलास माने, उपसरपंच नारायण महानोर, भाऊसाहेब कर्डिले, युवराज टेहळे, भुजंग पवार, गणेश महानोर, मधुकर हापटे, चेअरमन भारत शेंबडे, फौजी प्रकाश महानोर, शरद नागरगोजे, तुकाराम शेंबडे, रमजान पठाण, तानाजी शेंबडे,महारुद्र महानोर, गोवर्धन थोरात, एकनाथ हाके, हरिश्चंद्र भारती, भरत हाके, रामेश्वर गाजरे, गणेश हाके, ज्ञानेश्वर कर्डीले सह आदींनी परिश्रम घेतले.

### शाळेला दिला संकणक संच भेट

शाळेस ग्रामस्थांच्या व शालेस समितीच्या सहकाऱ्यातून सामुदायिक वर्गणी करून एक तर जालना येथे एसरपीएफ मध्ये कार्यरत अलेले पोलीस व माजी विद्यार्थी विजय महानोर यांच्याकडून एक असे दोन संगणक संच भेट देण्यात आले. या संगणक संचामुळे विद्यार्थ्यांना संगणकीय ज्ञान घेता येईल.

## नागरिकांसाठी आरबीआयकडून बँकिंग तक्रार निवारणाची सुविधा

जालना। प्रतिनिधी

अलीकडील काळात जालना जिल्ह्यात बँकिंग व्यवहारांशी संबंधित तक्रारी, गैरसमज आणि काही अप्रिय घटना समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांना बँकिंग तक्रार निवारण व्यवस्थेबाबत स्पष्ट व अधिकृत माहिती मिळावी यासाठी जिल्हा अग्रणी बँकेकडून प्रसिद्धी करण्यात आली आहे. बँकिंग व्यवहारांबाबत कोणतीही तक्रार असल्यास नागरिकांनी प्रथम संबंधित बँकेच्या अंतर्गत तक्रार निवारण यंत्रणेकडे तक्रार दाखल करावी. प्रत्येक बँकेच्या शाखा परिसरात तसेच बँकिंग ओम्बुड्समनबाबत तपशील ठळकपणे प्रदर्शित केलेले असतात.

तक्रार दाखल केल्यानंतर ३० दिवसांत समाधानकारक उत्तर न मिळाल्यास नागरिकांना थेट भारतीय रिझर्व्ह बँकेच्या एकात्मिक बँकिंग ओम्बुड्समन योजनेअंतर्गत तक्रार नोंदवता येते. यासाठी जिल्हा प्रशासन किंवा इतर शासकीय कार्यालयात जाण्याची आवश्यकता नाही. बँकिंग ओम्बुड्समन योजनेअंतर्गत एटीएम व्यवहार, खात्यातील चुकीची कपात, कर्ज व व्याजदर, चेक, डिजिटल फसवणूक, सेवा शुल्क, पेन्शन व विमा इत्यादी तक्रारींचे निवारण केले जाते. तसेच संबंधित यंत्रणेला दंडात्मक कारवाई करण्याचा आणि तक्रारदार ग्राहकांना नुकसानभरपाई देण्याचा अधिकार आहे. तक्रार निवारण सेवा पूर्णतः मोफत, ऑनलाइन आणि पारदर्शक असून, तक्रारींचा पाठपुरावा देखील ऑनलाइन पद्धतीने करता येतो. नागरिकांनी अफवा, गैरसमज किंवा आंदोलनाचा मार्ग न अवलंबता उपलब्ध अधिकृत तक्रार निवारण यंत्रणांचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार यांनी केले आहे.

cmyk

# वंजारवाडी तलाव आणि पाट दुरूस्तीच्या कामाला १ कोटी ७ लाखांचा निधी

## राजुरी परिसरातील ८ ते १० गावांच्या शेतीसिंचनाचा प्रश्न आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्यातून मार्गी

**बीड । प्रतिनिधी**

**वंजारवाडी लघु प्रकल्प तलाव दुरूस्ती आणि पाट दुरूस्तीच्या कामासाठी जलसंपदा विभागाकडून १ कोटी ७ लाखांच्या निधीसह मंजुरी देण्यात आली आहे. सदरील काम हे निविदास्तरावर असून लवकरच प्रत्यक्षात कामाला सुरुवात होणार आहे. यामुळे राजुरी परिसरातील ८ ते १० गावांच्या शेतीसिंचनाचा प्रश्न कायमचा मार्गी लागणार आहे. आ.संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यातून हा मोठा प्रश्न मार्गी लागला आहे.**

बीड तालुक्यातील वंजारवाडी लघू प्रकल्प असलेला तलावाचे काम सन १९६५ मध्ये पूर्ण झाले आहे. या प्रकल्पाची सिंचन क्षमता ही १०५२ हेक्टर आहे. तलाव म्हणजे राजूरी परिसरातील ८ ते १० गावांना शेती सिंचनासाठी पूरक ठरू शकणारा स्त्रोत आहे. परंतु सदरील तलावाचे काम मोठ्या कालवधीपूर्वी झाल्यामुळे याठिकाणी मुख्य बांधकाम कमकुवत होणे, त्यातून पाण्याची गळती होणे, सांडव्याची दुभाजक भिंत मोडकळीस आली होती. त्यामुळे येथे आवश्यक ती दुरूस्तीची कामे होणे अत्यंत गरजेचे होते. ही बाब लक्षात घेऊन राजूरी



परिसरातील शेतकरी बांधवांनी आदर्श गाव वंजारवाडीचे सरपंच वैजनाथ तांदळे यांच्या माध्यमातून हा प्रश्न आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे मांडला. त्यावर आ.क्षीरसागर यांनी या संदर्भात शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. परिणामी वंजारवाडी तलाव आणि पाटदुरूस्तीच्या कामासाठी १ कोटी ७ लाख रूपयांचा भरघोस निधीसह मंजूरी मिळाली आहे.आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. त्यामुळे राजूरी, वंजारवाडी आणि परिसरातील गावांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

### डोमरी तलावाचे पाणी वंजारवाडी तलावात आणण्यासाठीही पाठपुरावा सुरू, स्व.अजितदादांनीही दिले होते निर्देश

मागील अनेक वर्षांपासून डोमरी तलावामध्ये अतिरिक्त असलेले पाणी वंजारवाडी तलावात वळविण्यासाठी मागणी आहे. आ.संदीप क्षीरसागर हे मागील अनेक दिवसांपासून डोमरी तलावातील अतिरिक्त (ओव्हरफ्लो) पाणी वंजारवाडी तलावात लिफ्टींगद्वारे आणण्यासाठी आणि वंजारवाडी धरणाची उंची वाढवण्यासाठी शासन आणि प्रशासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत. दरम्यान सन २००७ मध्ये स्व.अजित दादा पवार जलसंपदा मंत्री असताना, डोमरी धरणातील अतिरिक्त पाणी वंजारवाडी धरणात वळवणे आणि वंजारवाडी तलावाची उंची वाढविण्याचा कामासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते.

# जामगावची निकिता झांबरे पोलीस दलात

## आ.सुरेश धस यांनी सत्कार करून दिल्या शुभेच्छा



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील जामगाव गावातील विद्यार्थिनी निकिता नितीन झांबरे ही नुकतीच पोलीस दलात भरती झाली आहे आष्टी शहरातील बाबाजी अकॅडमी मध्ये राहुल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तिने सराव करून हे यश संपादन केले आहे तिच्या या निवडीबद्दल जामगाव चे भूमिपुत्र आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांनी तिचे व तिच्या वडिलांचे अभिनंदन करून स्वागत केले. मुली देखील आता प्रत्येक क्षेत्रामध्ये अग्रेसर होत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे निकिताने लहानपणापासून मला पोलीस व्हायचे अशी स्वप्न पाहिली होती तिचे शिक्षण निवृत्ती धस विद्यालय जामगाव येथे झाले तर उच्च माध्यमिक शिक्षण बीड हंबर्डे महाविद्यालयात झाले असल्याचे तिने सांगितले माझ्या मुलीने

जिद्द, चिकाटी व अथक परिश्रमाच्या जोरावर महाराष्ट्र पोलीस दलात यश संपादन केले असून, हे आपले स्वप्न आज साकार झाल्याची भावना कु. निकिता नितीन झांबरे हिचे वडील श्री. नितीन झांबरे यांनी व्यक्त केली.

''माझी मुलगी पोलीस दलात भरती व्हावी, हे स्वप्न होते. आज तिने केवळ माझेच नव्हे तर संपूर्ण गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशामागे आमचे आधारस्तंभ मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस तसेच देविदास आबा धस यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या मार्गदर्शन व मदतीमुळेच माझ्या मुलीला पुढे जाण्यास आवश्यक बळ मिळाले,'' असे श्री. नितीन झांबरे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. तिच्या या निवडीबद्दल सतीश शेठ धस , विनोद रोडे स्वयंसहाय्यक आमदार सुरेश धस, रमेश गावडे भाजपा तालुकाध्यक्ष राजाभाऊ दहातोंडे,संतोष मुरकुटे माजी नगरसेवक माजी सरपंच संभाजी झांबरे आधी सह मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. मुंबई येथे कारागृह पोलीस म्हणून तिची निवड झाली आहे.

# स्नेहसंमेलनातून सुप्त कलागुणांना वाव मिळतो–डॉ.क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

के.एस.के. महाविद्यालयातील विविध विभागांतील विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनातून कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले. स्नेहसंमेलन हे विद्यार्थ्यांना त्यांच्या विविध सुप्त गुणांना वाव देण्याची उत्तम संधी असते, असे प्रतिपादन नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

बीडमध्ये के.एस.के. महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवारी उत्साहात पार पडले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर नगरसेवक गोविंद शिराळे, नंदकुमार पिंगळे, सामाजिक कार्यकर्ते अशोक शेजुळ, संस्थेचे सदस्य आमेर सिद्दीकी व शुभम कांतागळे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लोकनृत्यांनी उपस्थितांची मने जिंकली. वर्षभरात शैक्षणिक, क्रीडा व इतर क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना प्रशस्तीपत्रे




प्रदान करण्यात आली. स्नेहसंमेलनातील क्रीडा स्पर्धा, नृत्य, संगीत व इतर उपक्रम शांततेत, सलोख्याच्या वातावरणात पार पडल्याबद्दल डॉ.क्षीरसागर यांनी समाधान व्यक्त केले. महाविद्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी अनुरथ गणगे, शिक्षकेत्तर कर्मचारी आर.टी. जाधव, कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक प्रा.अनिल जाधव, वरिष्ठ महाविद्यालयातील डॉ.शंकर राऊत व महिला कर्मचारी डॉ.वंदना फटाले यांना उत्कृष्ट कर्मचारी म्हणून प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच, ग्रंथालय विभागातील उत्कृष्ट वाचक विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे आदर्श स्वयंसेवक आणि स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने मराठी, हिंदी, इंग्रजी, सूक्ष्मजीवशास्त्र, वनस्पतीशास्त्र, जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, गृहशास्त्र, भूगोल, एनसीसी, शारीरिक शिक्षण, संगीत, नाट्यशास्त्र व क्रीडा विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांना पुरस्कार व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाला संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वंभर देशमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ.अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए. एस., कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक डॉ.जालिंदर कोळेकर आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ.शंकर राऊत व प्रा. दत्तात्रय नेटके यांनी केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कडा येथे सोमवारपासून महाशिवरात्र महोत्सवास प्रारंभ

## बबन महाराज बहिरवाल यांची रंगणार श्रीराम कथा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा येथील महेशनगर येथे श्री महेश मंदिर ट्रस्टच्या वतीने १२ व्या महाशिवरात्री महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. ९ फेब्रुवारी ते सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हा भक्तिमय सोहळा पार पडणार असून यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल (अध्यक्ष, मदन महाराज संस्थान व सेवाश्रम) यांच्या रसाळ वाणीतून दररोज रात्री ६ ते ९ या वेळेत रंगणारी श्रीराम कथा हे आहे. या कथेसाठी ह.भ.प. धनंजय महाराज कदम, ह.भ.प. अनिकेत महाराज चांगुणे, ह.भ.प. कृष्णा महाराज खांडगे आणि ह.भ.प. हंसराज महाराज मगर हे कलाकार साथसंगत करणार आहेत.

सप्ताहाच्या काळात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ८ ते ९ विष्णू सहस्त्रनाम आणि ९:३० ते १ या वेळेत श्री शिवलीलामृत ग्रंथ पारायण पार पडेल. तसेच दुपारी २:३० ते ५ श्री संत कथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ आणि रात्री ९ ते पहाटे ४ या वेळेत जागर असे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. महोत्सवाची सांगता सोमवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल आणि त्यानंतर महाप्रसादाचे वाटप केले जाईल. ◀◀ पान ३ वर



# माजी खासदार स्वर्गीय रामरावजी आवरगावकर स्मृतिदिनानिमित्ताने अभिवादन


किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सदस्य माजी खासदार तथा बीड जिल्ह्यातील थोर स्वातंत्र्यसेनानी स्वर्गीय रामरावजी आवरगावकर यांच्या स्मृतीनिमित्ताने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. बीड मधील बीड न्यूज या पहिल्या वृत्तपत्राचे आणि जिल्हा पत्रकार संघाचे ते प्रथम अध्यक्ष होते. माजी खासदार स्वर्गीय रामरावजी आवरगावकर यांनी धारूर सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध केली. धारूर सारख्या ठिकाणी विविध सोयी सुविधांची निर्मिती करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. याप्रसंगी उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजलगाव वकील संघात माता रमाई जयंती उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

येथील वकील संघाच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती दि.७ फेब्रुवारी शनिवार रोजी साजरी करण्यात आली.या कार्यक्रमात माता रमाई यांच्या जिवनाविषयी सिनियर अॅड.व्ही.जी. तिके,अॅड.एम.ए.डोंगरे,अॅड शिंदे,अॅड.जाधव यांनी मनोगत व्यक्त केले.



तसेच अॅड.सीमा उजगरे/जाधव मॅडम,अॅड.बि. एस .घनघाव यांनी रमाईचे गीत गाऊन अभिवादन केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वकील संघाचे सचिव अॅड. नारायण तेलगड यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार उपाध्यक्ष अॅड.जाधव यांनी मानले कार्यक्रमासाठी वकील संघातील अॅड.जोशी, अॅड.गजमल, अॅड.शर्मा,अॅड.खळगे, अॅड.विजय मस्के, अॅड.नाईकवाडे, अॅड.हिंगणे, अॅड. सातपुते, अॅड. सोळंके, अॅड.गरड,अॅड.टाकणखार तसेच यावेळी वकील संघातील महिला सदस्य अॅड. गाडेकर, अॅड.वडमारे, अॅड.भोसले, अॅड.बागल,अॅड.राठोड यांच्या सह आदी सदस्य उपस्थित होते.

# कडा कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकरी भवन उभारणार

## ▶ आ. सुरेश धस यांच्या पुढाकाराने १ कोटी ६२ लाखांच्या इमारतीस प्रशासकीय मान्यता

आष्टी । प्रतिनिधी



कडा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक असलेल्या नवीन शेतकरी भवनाच्या उभारणीस राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या पुढाकाराने व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन या इमारतीसाठी १ कोटी ६२ लाख ६३ हजार ३०० रुपयांच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे कडा परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या योजनेअंतर्गत राज्य शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने ३ फेब्रुवारी २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. या निर्णयानुसार कृषी उत्पन्न बाजार समिती, कडा येथे शेतकऱ्यांच्या मुक्कामासाठी तसेच आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे शेतकरी भवन उभारले जाणार आहे, अशी माहिती बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी यांनी दिली.

राज्यातील अनेक कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकरी भवनांची कमतरता आहे. कडा येथे कृषी उत्पन्न बाजार समितीची ही बाब लक्षात घेऊन शासनाने नवीन इमारत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

या प्रकल्पासाठी एकूण खर्चाच्या ७० टक्के म्हणजेच सुमारे १ कोटी ७ लाख ४ हजार रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले असून, हे ◀◀ पान ३ वर

# स्वच्छ, सुंदर बीडसाठी आ.विजयसिंह पंडित यांचा पुढाकार



## शिवजयंती व रमजान सणाच्या पार्श्वभुमीवर विशेष स्वच्छता मोहिम, स्वच्छता, विद्युत व पाणी पुरवठा विभागाच्या बैठकीत निर्णय

बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने व मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरु होत असल्याने स्वच्छ, सुंदर बीडसाठी आ. विजयसिंह पंडित यांनी पुढाकार घेतला आहे. नगर पालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलताताई पारवे, उपाध्यक्ष विनोद मुळूक, नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत आ. विजयसिंह पंडित यांनी स्वच्छता, विद्युत व पाणी पुरवठ्याच्या आढावा बैठकीत शहरात विशेष स्वच्छता मोहिम प्रभागनिहाय सुरु करून बंद असलेले पथदिवे तात्काळ दुरुस्त करावेत, आवश्यक ठिकाणी नव्याने लाईट बसविण्यात यावेत, शहरातील नळ पाणी पुरवठा वेळेत करण्यात यावा, पाणी सुटण्याचे वेळापत्रक नागरीकांना कळविण्यात यावेत अशा सूचना पालिका प्रशासनाला दिल्या आहेत. यावेळी मुख्याधिकारी शैलेश फडसे गटनेते फारुक पटेल, स्वच्छता सभापती शेख निजाम, नगरसेवक मोईन मास्टर, नगरसेवक अमर नाईकवाडे यांची उपस्थिती होती.

शनिवार, दि.७ फेब्रुवारी रोजी बीड नगर परिषदेच्या स्वच्छता, विद्युत व पाणी पुरवठा विभागाचा आढावा घेण्यात आला, यावेळी ते पालिका प्रशासनाशी बोलत होते. शहरातील जनतेने विकासासाठी भरभरून आशिर्वाद दिलेले ◀◀ पान ३ वर

# विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी श्रीमंत योगी आश्रम शाळेतून केला मोबाईल हद्दपार

**बीड । प्रतिनिधी**

सध्याच्या परिस्थितीमध्ये मोबाईल मुळे विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होत असून मोबाईलमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तर होतच असून यामुळे आतापर्यंत कित्येक विद्यार्थ्यांचे जीव सुद्धा गेलेले आहेत.. यावर उपाययोजना म्हणून

श्रीमंतयोगी आश्रम शाळेत मोबाईल मुक्त अभियान राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांना मोबाईल पासून दूर ठेवण्यात आले आहे.. श्रीमंतयोगी आश्रम शाळेत अतिशय सुंदर असा हा उपक्रम राबवला गेला असून याच पद्धतीने इतर शाळेत सुद्धा मोबाईल हद्दपार होणे ही काळाची गरज आहे श्रीमंतयोगी प्राथमिक माध्यमिक ◀◀ पान ३ वर





# जिल्ह्याचा अभिमान वाढेल असे यश संपादन करा- डॉ.ओमप्रकाश शेटे

## महाराणी ताराबाई विद्यालयातील १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या मातीला इतिहास,वारसा आहे गुणवत्तेच्या जोरावर होऊ घातलेल्या इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करून बीड जिल्ह्याचा अभिमान वाढवावा असे मार्गदर्शन महाराणी ताराबाई विद्यालयातील इयत्ता- दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाच्या कार्यक्रम प्रसंगी

आयुष्यमान भारत मिशन समितीचे प्रमुख,देवदूत मा.डॉ.ओमप्रकाशजी शेटे यांनी केले.



वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता- १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ शुक्रवार दि.०६ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यालयांमध्ये आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे संस्थापक तथा माजी आमदार केशवराव आंधळे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा.श्री.डॉ.ओमप्रकाशजी शेटे अध्यक्ष-आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती तसेच प्रमुख पाहुणे म्हणून स.पो.नि. वर्षा व्हगाडे मॅडम,उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे,पत्रकार बंडूजी खांडेकर,सरपंच भगवानरावजी कांदे,उद्योजक नागेश कानडे,सेवानिवृत्त मुख्याध्यापक मधुकररावजी धस सर,श्री.फासे सर,डॉ.हांगे साहेब,वडवणी शहराध्यक्ष भाजपा श्रीमंतजी मुंडे,संस्थेचे माजी अध्यक्ष राजेभाऊ वारे,पत्रकार डोईफोडे सर,संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे,प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर,श्री.दिनेशजी घोळवे सर अदी मान्यवर म्हणून उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. आरती खेत्रे, हर्षदा कदम यांनी स्वागत गीत गाऊन मान्यवरांचे स्वागत केले. विद्यार्थी प्रतिनिधी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# जुन्नर तालुक्यात 'बोगस' मतदानामुळे युवकांचा संताप!

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणात अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या रणधुमाळीत आज जुन्नर तालुक्यातील अणे-माळशेज पट्ट्यात मतदानाचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. दुर्गम डोंगरदऱ्यांपासून ते ग्रामीण व शहरी भागापर्यंत सर्वत्र मतदारांनी सकाळपासूनच केंद्रांवर गर्दी केली होती. मात्र, एकीकडे मतदानाचा उत्साह असताना दुसरीकडे प्रशासकीय सावळागोंधळ आणि बोगस मतदानाच्या तक्रारींमुळे अनेक ठिकाणी तणावाचे वातावरणही निर्माण झाले होते.



जुन्नर तालुक्यातील भौगोलिक परिस्थिती अत्यंत आव्हानात्मक आहे. येथील वयोवृद्ध मतदारांनी दाखवलेली निष्ठा वाखाणण्याजोगी होती. अनेक केंद्रांवर ८० ते ९० वयोगटातील वृद्ध नागरिक आपल्या नातवंडांच्या हाताला धरून किंवा लाकडी काठीचा आधार घेत मतदानासाठी पोहोचले होते. वयाची नव्वदी गाठली तरी मतदान करायला कधी चुकलो नाही. विकास करणारा माणूस निवडण्याचा हाच तो दिवस, अशी भावना ओतूर येथील चैतन्य विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक मुरलीधर गहिनाजी भोर गुरुजी (वय वर्षे ९७ ) या ज्येष्ठ मतदाराने व्यक्त केली. शारीरिक व्याधी असूनही केवळ लोकशाहीवरील श्रद्धेपोटी या ज्येष्ठांनी केंद्रावर केलेली गर्दी ही नवमतदारांसाठी एक मोठा धडा ठरली.

व्यापारी आणि शेतीसाठी महत्त्वाचे केंद्र असलेल्या ओतूर शहरात आणि परिसरातील गावांमध्ये सकाळच्या पहिल्या चार तासांत विक्रमी मतदानाची नोंद झाली. सध्या शेतीकामांचा हंगाम सुरू असल्याने शेतकऱ्यांनी सकाळी ७ वाजल्यापासूनच मतदान केंद्रांवर रांगा लावल्या होत्या. १० वाजेपर्यंत बहुतांश केंद्रांवर लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या. विशेषतः महिला मतदारांचा सहभाग यावेळी लक्षणीय होता. महिलांनी आपले घरकाम लवकर उरकून लोकशाहीच्या या उत्सवात हिरीरीने सहभाग नोंदवला. ज्यावेळी मतदार मोठ्या उत्साहाने केंद्रावर पोहोचत होते, त्याचवेळी अनेक ठिकाणी मतदार यादीतील त्रुटींनी गोंधळ उडवून दिला. अणे-माळशेज पट्ट्यातील काही गावांमधील जुन्या जाणत्या मतदारांची नावे अचानक यादीतून गायब झाल्याचे समोर आले. गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही याच केंद्रावर मतदान करतो, पण आज नाव शोधताना कर्माची फळं भोगावी लागत आहेत, असा संतप्त सवाल काही नागरिकांनी उपस्थित केला. अनेक मतदारांनी आधार कार्ड आणि ओळखपत्र आणले असूनही, यादीत नाव नसल्याने त्यांना मतदानाविना माघारी फिरावे लागले. यामुळे प्रशासनावर आणि विशेषतः निवडणूक विभागाच्या नियोजनावर मतदारांनी तीव्र शब्दात ताशेरे ओढले.

## जुन्नरमध्ये शेततळ्यात दोन चिमुकल्यांचा बुडून मृत्यू, एकनाथ शिंदे यांचा कुटुंबाला मदतीचा हात

**पुणे । प्रतिनिधी**

शेततळ्यात बुडून मृत्युमुखी पडलेल्या आफान अफसर इनामदार ( वय १०) आणि रीफत अफसर इनामदार ( वय ७) या चिमुकल्यांच्या कुटुंबीयांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाच लाख रुपयांची मदत देऊ केली आहे. नगरपालिका निवडणुकीवेळी जुन्नरमध्ये प्रचारासाठी आले असता शिंदेंना या दुर्दैवी घटनेबद्दल कळल्यानंतर त्यांनी इनामदार कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली होती. त्यानंतर आता त्यांनी त्यांना मदतीचा हात देऊ केला आहे.



जुन्नरमध्ये २२ नोव्हेंबर रोजी घडलेल्या दुर्वेवी घटनेत अफसर इनामदार यांची दोन्ही मुले खेळत असताना शेततळ्यात पडल्याने त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने पूर्ण जुन्नर तालुका हळहळला, त्याच वेळी १ डिसेंबर रोजी नगरपालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी जुन्नर येथे गेले असता स्थानिक शिवसेना नगरसेवक मयुर महाबरे यांनी ही घटना आमदार शरद सोनवणे यांना सांगितली. त्यांनी तत्काळ उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या कानावर ही बाब घातली. यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी प्रचारातून वेळात वेळ काढून ईनामदार कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेऊन त्यांना मदतीचे आश्वासन दिले. त्यानुसार ६ फेब्रुवारी रोजी शिवसेनेच्या वतीने आमदार शरद सोनवणे, शिवसेना सचिव राम रेपाळे आणि युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, स्थानिक नगरसेवक मयुर महाबरे आणि स्थानिक शिवसैनिकांनी इनामदार कुटुंबाची भेट घेऊन पाच लाखांची ही मदत त्यांना सुपूर्द केली.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः व्हिडीओ कॉलद्वारे संवाद साधून इनामदार कुटुंबीयांचे सांत्वन केले. झालेली घटना दुर्दैवी असून स्वतःची मुले गमावण्याचे दुःख काय असते ते मला चांगले माहिती आहे, गेलेली व्यक्ती परत आणता येणे शक्य नसले तरीही या दुःखातून सावरण्यासाठी शिवसेना आपल्याला लागेल ती सर्व मदत नक्की करेल असे सांगितले. आपली झालेली हानी भरून काढता येणे अशक्य असले, तरीही या दुःखातून सावरण्यासाठी आपल्याला मदत पाठवली असून ती आपण मोठ्या मनाने स्वीकारावी अशी विनंती शिंदे यांनी केली. दिल्या हाकेला धावणारी आणि दिलेला शब्द पाळणारी व्यक्ती अशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ओळख आहे. धर्माच्या भिंती ओलांडत एका बापाने दुसऱ्या बापाला दिलेला शब्द पाळत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्यातील संवेदनशीलपणा पुन्हा एकदा दाखवून दिला आहे.

## वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ऊसतोड मजुराच्या ५ वर्षांच्या मुलाचा मृत्यू ; फडात आढळला मृतदेह



**नसरापूर । प्रतिनिधी**

ऊसतोड मजुराच्या पाच वर्षाचा मुलाचा अज्ञात वन्य प्राण्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. ही घटना केंजळ ( ता. भोर ) येथे आज (दि.७) सकाळी नऊ च्या सुमारास घडली. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. मात्र, राजगड पोलिस ठाण्यात अद्याप या घटनेबाबत नोंद करण्यात आलेली नाही. हा हल्ला बिबट्याने केला की इतर वन्यप्राणी केला, याचा वनविभागाला तपास करावा लागणार आहे. कृष्णा किरण सोनवणे (वय ५, रा. चाळीसगाव) असे वन्य प्राण्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या मुलाचे नाव आहे. येथील एका शेतकऱ्याच्या उसाच्या शेतात अत्यवस्थ जखमी अवस्थेत मुलगा आढळला. उपचारासाठी त्याला भोर जिल्हा उपरुग्णालयात नेण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. मृत्यूचे कारण समजू शकले नाही. अधिक माहिती अशी की, फलटण तालुक्यातील साखरवाडी कारखान्याचे ऊसतोड मजुराच्या केंजळ गावात कोप्या असून शेजारील शेतात ऊस तोडत असताना कृष्णा याला शौचालयाला आल्याने त्याची आई सरलाबाई हिने त्याला शेजारील शेताच्या बाजूला बसविले. काही वेळाने कृष्णा हा दिसेनासे झाल्याने ऊस मजुरांनी शोधाशोध केली असता कृष्णा हा रक्तबंबाळ अवस्थेत दिसला.

## उत्तम शिक्षकांमुळे चांगल्या शिक्षणसंस्था उभा राहतातः कुलगुरू डॉ. स्वाती मुजुमदार

**पुणे । प्रतिनिधी**

पूर्वी शिक्षण क्षेत्रात विद्यार्थी घडविण्यासाठी आणि त्यांना शिकविण्यासाठी म्हणून शिक्षक येत असत. या क्षेत्रात नफा आणि तोट्याचा विचार होत नसे. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी देखील शिक्षक म्हणून सुरुवात केली. त्यामुळे सिंबायोसिस शिक्षण संस्थेकडे पाहण्याचा सगळ्यांचा दृष्टिकोन वेगळा आहे. फक्त पायाभूत सुविधांनी शिक्षण संस्था चांगली होत नाही, तर उत्तम शिक्षकांमुळे चांगल्या शिक्षण संस्था उभ्या राहतात, असे मत सिंबायोसिस स्किल्स युनिव्हर्सिटीच्या कुलगुरू डॉ. स्वाती मुजुमदार यांनी व्यक्त केले.




रोटरी क्लब ऑफ पूना मिडटाउनच्या वतीने आयोजित सर्वोत्तम व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार प्रदान सोहळा टिळक रस्त्यावरील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स च्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. यंदाचा व्होकेशनल एक्सलन्स अवॉर्ड विश्वकर्मा ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. बिपीन सुळे यांना प्रदान करण्यात आला. यावेळी क्लबचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर वल्हवणकर , संचालक डॉ. हेमंत तोडकर, सचिव ड. शोभा सोमाणी आदी व्यासपीठावर उपस्थित होते. पुणेरी पगडी, शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

डॉ. स्वाती मुजुमदार म्हणाल्या, पुण्यात अनेक शिक्षण संस्था आहेत. आज शिक्षण क्षेत्राचे बाजारीकरण झाले आहे. यामध्ये नफा महत्वाचा नाही. अनेक शिक्षकांना पगार जास्त आहेत. मात्र, चांगली गुणवत्ता टिकवून ठेवणे हे अवघड आहे. शिक्षण क्षेत्रात आवड म्हणून शिक्षक येत नाही. त्यामुळे ही स्थिती देशाला घातक आहे. प्रत्येक महाविद्यालयात कौशल्याधिष्ठित शिक्षण देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ.बिपीन सुळे म्हणाले, रोटरी क्लब ही क्रियाभिमुख असलेली संस्था आहे. हातात घेतलेले काम पूर्ण करणारी ही विश्वसनीय संस्था असून अनेक सामाजिक उपक्रम संस्थेने राबविले आहेत. माणसाने समुद्रासारखे जगायला हवे. आपले काम नम्रपणे करावे. वय वाढल्यावर जेष्ठ व्हायला हवे, म्हातारे होऊ नये. म्हातारे होऊन आधार शोधण्यापेक्षा ज्येष्ठ होऊन आधार देणे महत्वाचे आहे. प्रास्ताविकात डॉ. चंद्रशेखर वल्हवणकर म्हणाले, रोटरी क्लब पूना मिडटाऊन मागील ५६ वर्षांपासून कार्यरत आहे. तब्बल १२० वर्षे ही जुनी संस्था असून २०० देशात कार्यरत आहे. स्वतःपेक्षा सेवेचा ध्यास हे रोटरी चे ब्रीद आहे. त्याप्रमाणे आपला क्लब देखील कार्यरत आहे. समाज परिवर्तनाची सशक्त अशी ही चळवळ असून विविध सामाजिक उपक्रम सातत्याने सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. शुभदा जठार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बिपिन सुळेंची ओळख माजी अध्यक्ष राजकुमार तांबे यांनी, तर प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. धनंजय केसकर यांनी करून दिली. मानपत्राचे वाचन वृषाली देशपांडे यांनी केले.

## दोन लाखांची लाच घेताना लष्करी अधिकाऱ्यांना रंगेहात पकडले; 'सीबीआय' ची कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

खडकीमधील लष्करी अभियांत्रिकी सेवा कार्यालय (मिलिटरी इंजिनिअरिंग सर्व्हिसेस - एमईएस) येथील दोन अधिकाऱ्यांना केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने (सीबीआय) दोन लाखांची लाच घेताना रंगेहाथ पकडले. या गुन्ह्याची नोंद खडकी पोलिस ठाण्यात करण्यात आली असून त्यांना अटक करण्यात आली आहे. सुनील निकम आणि सुरेश म्हस्के ही अटक करण्यात आलेल्या लाचखोर अधिकाऱ्यांची नावे आहेत.



म्हस्के हा कनिष्ठ अभियंता तर निकम हा असिस्टंट गॅरिसन इंजिनिअर आहे. या दोन्ही अधिकाऱ्यांच्या घरांच्या झडतीतही लाखो रुपयांची माया हाती लागली असल्याची माहिती पोलिसांनी दिली. 'एमइएस' तर्फे शहर व जिल्ह्यातील छावणी क्षेत्रातील बांधकामे आणि देखभाल व दुरुस्तीची कामे केली जातात. निकम व म्हस्के या दोघांकडे कंत्राटदारांच्या बिलांची मंजुरी देण्याचे काम आहे. त्यांनी एका ठेकेदारकडे बिलाच्या मंजुरीसाठी सहा लाख रुपये मागितले होते. त्यासाठी ते त्याला तगादा लावत होते. यासंदर्भात संबंधित ठेकेदाराने सीबीआय कडे तक्रार केली होती. या तक्रारीची पडताळणी अनेक दिवस सुरु होती. त्यामध्ये तथ्य आढळल्यानंतर सीबीआयच्या पथकाने शुक्रवारी 'एमईएस'मध्ये सापळा रचून म्हस्केला लाच घेताना रंगेहाथ पकडले. यामध्ये निकमचा सहभाग आढळल्याने त्यालाही अटक करण्यात आली. त्यांच्या घरांवरही सीबीआयने छापे टाकले. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर रोकड व महत्त्वाची कागदपत्रे हस्तगत करण्यात आली आहे. या कारवाईमुळे संरक्षण विभागाच्या बांधकाम विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

## ससून रुग्णालयात थरार! उपचारासाठी आलेल्यांवरच कोयत्याने वार; १८ जणांवर गुन्हे दाखल

पुणे । प्रतिनिधी

ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल झालेल्या चौघांवर शस्त्राने वार करण्यात आले. या घटनेत दोन्ही गटातील चौघे जण गंभीर जखमी झाले असून तिघांना अटक करण्यात आली. या प्रकरणी कोंढवा पोलीस ठाण्यात परस्परविरोधी फिर्यादी दाखल केल्या आहेत. दोन्ही गटातील १८ ते २० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत अस्लम हनीफ खान (वय ४२, रा. कुबेरा गार्डन, एनआयबीएम रस्ता, कोंढवा) यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.असलम खान, त्यांचा मोठा भाऊ सलीम खान आणि पुतण्या अब्दुल समद हे गंभीर जखमी झाले आहेत. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी शफाक अशफाक शेख (वय २९, रा. भाग्यलक्ष्मी टॉवर), शहबाज झाकीर खान (वय ३१, दोघे रा. भवानी पेठ) यांना अटक करण्यात आली आहे.

आरोपींसह सात ते आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, ३ फेब्रुवारीला फिर्यादी अस्लम खान हे कौसरबाग येथे गेले होते. या परिसरात काही जण शिवीगाळ करुन धक्काबुक्की करत होते. हे पाहून खान यांनी पोलीस नियंत्रण कक्षाला या घटनेची माहिती दिली.

आरोपी शफाक आणि साथीदारांनी त्यांना अडवत पोलिसांना दूरध्वनी का केला ? अशी विचारणा केली. ४ फेब्रुवारीला ते कोंढव्यातून निघाले होते. त्यावेळी आरोपी अफाक शफाक आणि साथीदारांनी खान यांना लोखंडी फायटरने मारहाण केली. पोलिसांनी त्यांना उपचारासाठी ससून रुग्णालयात पाठविले असताना ससून रुग्णालयात त्यांचा मोठा भाऊ सलीम खान, त्यांचा मुलगा अब्दुल तसेच काही मित्र आले.

ससून रुग्णालय प्रवेशद्वारावर एकाने अस्लम यांच्यावर शस्त्राने वार केला. अस्लम यांचा भाऊ सलीमवरही वार करण्यात आले. दरम्यान, शफाक अश्फाक शेख (वय २९, रा. कोंढवा) यानेही कोंढवा पोलीस ठाण्यात परस्परविरोधी फिर्याद दिली आहे. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नवनाथ जगताप आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक कुमार घाडगे तपास करत आहेत.

## पुणे महापालिकेचा १० टक्के मिळकतकर वाढीचा प्रस्ताव वादात; निर्णय पुढे ढकलला

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेच्या आर्थिक नियोजनावर थेट परिणाम करणारा मिळकतकरात १० टक्के वाढीचा प्रस्ताव पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मांडण्यात आलेल्या या प्रस्तावाला राजकीय पक्ष, नागरी संघटना आणि नागरिकांकडून तीव विरोध होत असल्याने शुक्रवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत तो पुढे ढकलण्यात आला. परिणामी, गेल्या दहा वर्षांतील पहिल्या संभाव्य करवाढीचा निर्णय आता नव्याने स्थापन होणाऱ्या स्थायी समितीच्या हाती जाणार आहे.



महापालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी मिळकत करात १० टक्के वाढ प्रशासनाने सुचवली होती. यामुळे पुणेकरांवर करवाढीचा बोजा पडणार होता. या निर्णयाला मोठा विरोध झाला होता. यामुळे प्रशासनाने हा निर्णय पुढे ढकलला आहे. पुढील आठवड्यात महापालिकेची नवीन स्थायी समिती अस्तित्वात येणार असल्याने, मिळकत कर वाढीबाबतचा अंतिम निर्णय आता नव्या सदस्यांना घ्यावा लागणार आहे. यापूर्वी २०१६ मध्ये महापालिका प्रशासनाने करवाढीचा प्रस्ताव मांडला होता. त्या वेळी महापालिकेच्या समान पाणीपुरवठा योजनेसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची गरज असल्याने तत्कालीन स्थायी समितीने ११ टक्के करवाढीस मान्यता दिली होती.

मात्र, २०१७ ते २०२२ या कालावधीत सादर करण्यात आलेले करवाढीचे प्रस्ताव तत्कालीन स्थायी समितीने फेटाळून लावले होते. मात्र, मागील दोन वर्षांत समाविष्ट गावांमधील करवसुलीला स्थगिती, तसेच नवीन मिळकतींची नोंदणी न झाल्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नावर मोठा ताण निर्माण झाला आहे. याच कारणांमुळे आता प्रशासनाकडून पुन्हा एकदा मिळकत करवाढीसाठी आग्रह धरला जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. महापालिकेच्या मिळकत करातून होणारे उत्पन्न अद्याप २ हजार ५०० कोटी रुपयांच्या पुढे गेलेले नाही. त्यातच राज्य सरकारने समाविष्ट गावांमधील मिळकत करवसुलीवर घातलेली बंदी, तसेच नवीन मिळकतींची नोंदणी रखडल्याने महापालिकेच्या उत्पन्नावर मोठा परिणाम झाला आहे. परिणामी, उत्पन्नाचे स्रोत कमी होत असताना प्रशासनाने मिळकत कर वाढविण्याची तयारी सुरू केल्याचे चित्र आहे.

प्रशासकीय राजवटीच्या काळातही महापालिका प्रशासनाकडून मिळकत करवाढीचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. मात्र, कोरोना संकट, तसेच हा धोरणात्मक निर्णय असल्याचे कारण देत तत्कालीन प्रशासक तथा आयुक्तांनीच स्थायी समितीत हे प्रस्ताव फेटाळले होते. महापालिकेची मुख्यसभा अस्तित्वात नसताना करवाढीस मान्यता देणे संयुक्तिक ठरणार नाही, असे सांगत त्या वेळी दरवाढ नाकारण्यात आली होती.

## पुणे-दिल्ली प्रीमियम रेल्वे सेवा उपलब्ध करा! डॉ. मेधा कुलकर्णी यांची राज्यसभेत मागणी

पुणे । प्रतिनिधी

देशातील महत्त्वाचे शैक्षणिक, औद्योगिक आणि आयटी केंद्र असलेल्या पुणे शहराला अद्यापही देशाची राजधानी नवी दिल्लीशी थेट, वेगवान आणि प्रीमियम श्रेणीची रेल्वे सेवा उपलब्ध नाही. केंद्र सरकारने पुणे-दिल्ली दरम्यान राजधानी एक्स्प्रेस, वंदे भारत स्लीपर किंवा तेजस एक्स्प्रेस यांसारखी प्रीमियम रेल्वे सेवा उपलब्ध करून द्यावी,



अशी मागणी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी राज्यसभेत केली. शून्य प्रहरात त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला.पुणे हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर देशातील प्रमुख शिक्षण, संशोधन, आयटी, स्टार्ट-अप आणि औद्योगिक केंद्र म्हणून विकसित झाले आहे. देशभरातून अनेक जण पुणे- दिल्लीदरम्यान नियमित प्रवास करतात. मात्र, सध्या या मार्गावरील रेल्वे प्रवासासाठी २० ते ३० तासांचा कालावधी लागतो. अनेक गाड्यांमध्ये वेळेची अनिश्चितता, प्रचंड गर्दी आणि मर्यादित सुविधा असल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे, असे डॉ. कुलकर्णी म्हणाल्या.देशातील अन्य प्रमुख शहरांना राजधानी, वंदे भारत आणि तेजससारख्या आधुनिक रेल्वे सेवांनी जोडण्यात आले आहे.

राजधानी एक्स्प्रेसमुळे राजधानी ते मोठी शहरे जलद, सुरक्षित आणि वेळेत जोडली गेली आहेत. वंदे भारत ट्रेनने रेल्वे प्रवासाची संकल्पनाच बदलली असून, आता लांब पल्ल्यासाठी वंदे भारत स्लीपर गाड्यांचाही विचार सुरू आहे. अशा वेळी पुण्यासारख्या महत्त्वाच्या शहराला या प्रीमियम सेवांपासून वंचित ठेवणे योग्य नाही. या पार्श्वभूमीवर पुणे-दिल्लीदरम्यान राजधानी एक्स्प्रेस, वंदे भारत स्लीपर किंवा तेजस एक्स्प्रेसपैकी कोणतीही थेट प्रीमियम रेल्वे सेवा तातडीने सुरू करावी. जेणेकरून व्यापार, गुंतवणूक, शिक्षण आणि प्रशासकीय समन्वयाला चालना मिळून 'विकसित भारत' या संकल्पनेला बळ मिळेल, असेही डॉ. कुलकर्णी म्हणाल्या.

## अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनाबाबत सुधारित कार्यपद्धती जाहीर

पुणे: राज्यातील मान्यताप्राप्त खासगी अनुदानित, अंशतः अनुदानित व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील अतिरिक्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनाबाबत सुधारित कार्यपद्धती जाहीर करण्यात आली आहे. सुधारित संचमान्यता निकषानुसार शाळा व्यवस्थापन प्रकारानुसार दि. २३-१०-२०२५ रोजीच्या पटावर नोंद असलेल्या आधार वैध विद्यार्थी संख्येनुसार डिसेंबर २०२५ मध्ये शिक्षणाधिकारी लॉगीनला उपलब्ध करून देण्यात आली आहे.

आतापर्यंत २०२४-२५ च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनाच्या कार्यवाहीस स्थगिती होती; परंतु उच्च न्यायालयाने सर्व याचिका आता निकाली काढलेल्या आहेत. त्यामुळे २०२५-२६च्या संचमान्यतेन्वये अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनाबाबतची रिक्त जागा (संवर्ग, विषय, इयत्ता निहाय) व अतिरिक्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांची तात्पुरती यादी १३ फेबुवारीला घोषित करावी लागणार आहे. सन २०२४-२५च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या समायोजनाबाबतची जिल्हास्तरावरील कार्यवाही ३ मार्चपर्यंत करावी लागणार आहे. जिल्हास्तरावरील समायोजनाची कार्यवाही पूर्ण झाल्यांनतर रिक्त जागा (संवर्ग, विषय, इयत्ता निहाय) व अतिरिक्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांची तात्पुरती यादी शिक्षणाधिकारी प्राथमिक / माध्यमिक यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयास दि. १० मार्चपूर्वी सादर करणे गरजेचे आहे.

## एपस्टीन फाइल्सवरून काँग्रेस आक्रमक! बालगंधर्व चौकात युवक काँग्रेसचे 'रास्ता रोको'

पुणे । प्रतिनिधी

एपस्टीन फाइल्समधून समोर आलेल्या धक्कादायक खुलाशांवर केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी जाणीवपूर्वक मौन बाळगत असल्याचा आरोप करत, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या वतीने पुण्यात तीव्र निदर्शने करण्यात आली. या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी बालगंधर्व चौकात रास्ता रोको करण्यात आला.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. या वेळी कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत रस्ता रोखून धरला. आंदोलनादरम्यान पोलिसांनी हस्तक्षेप करत काही कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. दरम्यान, एपस्टीन फाइल्समधील प्रकरणाने संपूर्ण जग हादरले असताना भारत सरकार यावर गप्प का आहे? लोकशाहीत प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही, मात्र, सरकार सत्य दडपण्याचा आणि विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे, जे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे, असा आरोप शिवराज मोरे यांनी केला.युवक काँग्रेसचे प्रसारमाध्यम विभागाचे अध्यक्ष अक्षय जैन यांनीही सरकारवर निशाणा साधला. पंतप्रधानांचे मौन संशयास्पद असून, जर



सत्ताधाऱ्यांना सत्याची भीती नसेल, तर त्यांनी निष्पक्ष चौकशीची घोषणा का केली नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.या आंदोलनात युवक काँग्रेसचे निरीक्षक ड. विवेक गावंडे, शहराध्यक्ष सौरभ अमराळे यांच्यासह अक्षय जैन, प्रथमेश आबनावे, गणेश उबाळे, राहुल शिरसाट आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.